अध्याय आठवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु तूं ज्योतिषी । एकात्मतेचें घटित पाहसी । चिद्ब्रह्मेंसीं लग्न लाविशी । ॐपुण्येंसीं तत्वतां ॥ १ ॥ वधूवरां लग्न लाविती । हें देखिलें असे बहुतीं । आपुली आपणा लग्नप्राप्ती । हे अलक्ष्य गती गुरुराया ॥ २ ॥ लग्न लाविती हातवटीं । पांचां पंचकांची आटाटी । चुकवूनि काळाची काळदृष्टी । घटिका प्रतिष्ठी निजबोधें ॥ ३ ॥ चहूं पुरुषार्थांचें तेलवण । लाडू वाइले संपूर्ण । अहंभावाचें निंबलोण । केलें जाण सर्वस्वें ॥ ४ ॥ साधनचतुष्टयाचा सम्यक । यथोक्त देऊनि मधुपर्क । जीवभावाची मूद देख । एकाएक सांडविली ॥ ५ ॥ विषयसुख मागें सांडे । तेंचि पायांतळीं पायमांडे । सावधान म्हणसी दोहींकडे । वचन धडफुडें तें तुझें ॥ ६ ॥ व्यवधानाचें विधान तुटे । सहजभावें अंत्रपट फिटे । शब्द उपरमोनि खुंटे । मुहूर्त गोमटे पैं तुझे ॥ ७ ॥ अर्धमात्रा समदृष्टी । निजबिंबीं पडे गांठी । ऐक्यभावाच्या मीनल्या मुष्टी । लग्नकसवटी अनुपम ॥ ८ ॥ तेथ काळा ना धवळा । गोरा नव्हे ना सांवळा । नोवरा लक्षेना डोळां । लग्नसोहळा ते ठायीं ॥ ९ ॥ परी नवल कैसें कवतिक । दुजेनवीण एकाएक । एकपणीं लग्न देख । लावितां तूं निःशेख गुरुराया ॥ १० ॥ तुज गुरुत्वें नमूं जातां । तंव आत्मा तूंचि आंतौता । आंतु कीं बाहेर पाहों जातां । सबीं सर्वथा तूंचि तूं ॥ ११ ॥ तुझें तूंपण पाहतां । माझें मीपण गेलें तत्त्वतां । ऐसें करूनियां गुरुनाथा । ग्रंथकथा करविसी

हे ओंकाररूप सद्गुरो! तुला नमस्कार असो. तूं एक ज्योतिषी आहेस. तूं जीवाचें आत्म्याशीं ऐक्य साधण्याचें गणित करून मुहूर्त पहातोस. 'ॐ पुण्याहं' या मंत्रानें तूं चित् व ब्रह्म या दोघांचें लग्न लावितोस. १ वधूवरांचें लग्न लागलेलें पुष्कळांनीं पाहिलें आहे. पण हे गुरुराया! स्वतःचें स्वतःशींच लग्न लावण्यांत मात्र तुझें कौशल्य मोठें विलक्षण आहे. २ लग्न लावण्याची तुझी पद्धतहि विचित्रच आहे. तूं पंचवीस तत्त्वांची कचाटी व काळाची काळदृष्टि चुकवून आत्मबोधानें घटिका स्थापितोस. ३ लौकिक वराला रुखवत नेतात, त्यांत लाडू वगैरे पदार्थ जसे न्यावे लागतात, तद्वतच ब्रह्माला धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांचें तेलवण अर्पण करावें लागतें. देहात्मबुद्धीचें लिंबलोण करून तें त्यावरून उतरून टाकिलें. (एक अहंभाव टाकिला कीं त्याबरोबर स्त्री-पुत्र-गृहांवरील आसक्ति आपोआपच नाहींशी होते.) ४ वैराग्य, विवेक, शम-दम-तितिक्षा-उपरति-श्रद्धा-समाधान व मुमुक्षुत्व या साधनचतुष्टयाचा मधुपर्क अर्पण करून नंतर जीवभावाच्या भाताची मूद ओवाळून टाकिली. ५ (साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षूची गुरूशीं भेट होतांच त्यानें दाखविलेल्या मार्गानें जात असतां अकस्मात् आत्मसाक्षात्कार होऊन जीवभाव नाहींसा होतो.) विषयसुख मागें पडतें, त्याच पायवड्या होत. 'सावधान' या शब्दानें 'एकच अवधान ठेव' असें दोहोंबाजूनें सांगितलेलें तुझें वचन अगदीं खरें आहे. ६ विषयचिंतन हाच जीवब्रह्मामधला अंतःपट आहे. तो सहजसमाधीनें दूर झाला कीं शब्द थांबून आंत बाहेर कांहीं उरत नाहीं. असा तुझा मुहूर्त मोठा मंगलकारक असतो. ७ प्रणवांतील अर्धमात्रेच्या समदृष्टीनें आत्मबिंबाशीं गांठ पडते व ऐक्यभावाच्या मुठी मिटतात. ही तुझी लग्नपरीक्षा अपूर्व आहे. ८ जो काळा नाहीं, निमगोरा नाहीं, गोरा नाहीं, सांवळा नाहीं असा नवरा मुलगा मुलीं डोळ्यांनीं दिसत नाहीं. तथापि त्याचा हा लग्नसोहळा! ९ पण हे गुरुराया! ही केवढ्या आश्चर्याची व कौतुकाची गोष्ट आहे कीं, दुसरें कोणीहि नसतांना तूं एकट्याचेंच एकाकी एकाबरोबर लग्न लावितोस! १० तुला गुरु म्हणून वंदन करावयास जावें तर अंतरात्मा तूंच आहेस. आंत बाहेर पाहूं गेलें तरी सर्वत्र तूंच भरलेला आहेस. ११ तुझें 'तूंपण' पाहूं गेलों तों माझेंच 'मीपण' नाहींसें झालें. असें करून तूं माझ्या तोंडून हे गुरुनाथा! ग्रंथकथा बोलवीत आहेस. १२ सातव्या अध्यायाच्या

॥ १२ ॥ मागील कथासंगती । सप्तमाध्यायाचे अंतीं । अवधूतें यदुप्रती । कथा कापोती सांगीतली ॥ १३ ॥ पृथ्वी आदिअंतीं चोखट । कपोतापर्यंत गुरु आठ । सांगितले अतिश्रेष्ठ । गुरु वरिष्ठ निजबोधें ॥ १४ ॥ उरल्या गुरूंची स्थिती । अवधूत सांगेल यदुप्रती । तेथें सावधान ठेवा चित्तवृत्ती । श्रवणें स्थिति तद्बोधें ॥ १५ ॥

ब्रा० उ०-सुखमैन्द्रियकं राजन् स्वर्गे नरक एव च । देहिनां यद्यथा दुःखं तस्मान्नेच्छेत तद्बुधः ॥ १ ॥

श्रवणीं सादरता यदूसी । देखोनि सुख झालें ब्राह्मणासी । तेणें सुखें निरूपणासी । उल्हासेंसीं करितसे ॥ १६ ॥ तो म्हणे राया सावधान । विषयसुखाचें जें सेवन । तें स्वर्गनरकीं गा समान । नाहीं अनमान ये अर्थीं ॥ १७ ॥ भोगितां उर्वशीसी । जें सुख स्वर्गीं इंद्रासी । तेंचि विष्ठेमाजीं सूकरासी । सूकरीपासीं निश्चित ॥ १८ ॥ हें जाणोनि साधुजन । उभय भोगीं न घालिती मन । नेदवे प्रेतासी आलिंगन । तेवीं साधुजन विषयांसी ॥ १९ ॥ जीत सापू धरावा हातीं । हें प्राणियांसी नुपजे चित्तीं । तेवीं विषयांची आसक्ती । साधु न धरिती सर्वथा ॥ २० ॥ जैसें न प्रार्थितां दुःख । प्राणी पावताती देख । तैसें न इच्छितां इंद्रियसुख । भोगवी आवश्यक अदृष्ट ॥ २१ ॥ मज दुःखभोगु व्हावा । हें नावडे कोणाच्या जीवा । तें दुःख आणि अदृष्टा तेव्हां । तेवीं सुखाचा यावा अदृष्टें ॥ २२ ॥ ऐसें असोनि उद्योगु करितां । तेणें आयुष्य नाशिलें सर्वथा । यालागीं सांडूनि विषयआस्था । परमार्थी भजावें

शेवटीं अवधूतानें यदूला कपोताचा वृत्तान्त सांगितला असा मागील कथासंबंध आहे. १३ आदीपासून अंतापर्यंत उत्तम असलेल्या पृथ्वीपासून कपोतापर्यंत आठ अत्यंत श्रेष्ठ गुरु सांगितले. आत्मज्ञानानेंच गुरु श्रेष्ठ होतात. १४ आतां अवधूत यदूला उरलेल्या गुरूंची कथा सांगेल. यास्तव चित्त सावधान ठेवून त्यांतील बोध ऐका. १५.

(आठव्या अध्यायांत अजगरादि नवजणांपासून अवधूतानें कोणता उपदेश घेतला हें हरि उद्धवाला विवेक करण्यासाठीं अवधूताच्या वाणीनें सांगत आहे.)

—प्रारब्धकर्माचें फल अवश्य भोगावें लागतें. यास्तव त्या भोगासाठीं उद्यम करण्यांत आयुष्यांचा वृथा व्यय करूं नये, हा उपदेश मीं अजगरापासून घेतला, असें अवधूत सांगतो—

ब्राह्मणः उवाच—ब्राह्मण म्हणाला, राजन्-हे राजा, यथा दुःखं तथा देहिनां ऐन्द्रियकं यत् सुखं तत् स्वर्गे नरके च भवति एव—जसें दुःख तसेंच प्राण्यांना इंद्रियांपासून होणारें जें सुख तें स्वर्गांत व नरकांतहि होतेंच, तस्मात् बुधः तत् न इच्छेत्-म्हणून विवेक्यानें त्यांची इच्छा करूं नये. १.

यदूला ऐकण्याची मोठी आवड आहे, हें पाहून ब्राह्मणाला मोठा आनंद वाटला. त्या संतोषाच्या भरांत त्यानें मोठ्या उल्हासानें पुढील निरूपण केलें. १६ तो म्हणाला, हे राजा ! लक्ष देऊन ऐक. विषयसुखाचें सेवन स्वर्गांत किंवा नरकांत सारखेंच असतें, यांत मुळींच संशय नाहीं. १७ स्वर्गामध्यें उर्वशीपासून इंद्राला जें सुख मिळतें, तसेंच सुख घाणींत लोळणाऱ्या डुकराला डुकरिणीपासून खात्रीनें मिळतें. १८ हें जाणून सत्पुरुष या दोन्ही प्रकारच्या सुखांत मन आसक्त करीत नाहींत. प्रेताला जसें आलिंगन देत नाहींत, तसेंच साधु विषयाला स्पर्श करीत नाहींत. १९ जिवंत साप हातांत धरावा असें कोणाहि माणसाच्या मनांत जसें कधींच येत नाहीं, त्याचप्रमाणें साधु विषयांची आसक्ति सर्वथा धरीत नाहींत. २० प्राण्यांना न मागतांच दुःख भोगावें लागतें, त्याचप्रमाणें इच्छा न करितांच प्राक्तन त्यांना इंद्रियसुख बळेंच भोगवितें. २१ कोणाहि जीवाला ‘ मला दुःख व्हावें ’ असें वाटत नाहीं; परंतु प्रारब्ध त्यांना न मागतांच जसें दुःख भोगावयास लावितें तसें तें त्यांना सुखाचा लाभहि देत असतें. २२ असें असूनहि लोक त्यासाठीं खटपट करीत असतात व आपल्या आयुष्याचा व्यर्थ नाश

॥ २३ ॥ केवळ झालिया परमार्थपर । म्हणसी आहारेंवीण न राहे शरीर । येच निर्धारीं साचार । गुरु अजगर म्यां केला ॥ २४ ॥

ग्रासं सुमृष्टं विरसं महान्तं स्तोकमेव वा । यदृच्छयैवापतितं ग्रसेदाजगरोऽक्रियः ॥ २ ॥

उद्योगेंवीण आहारू । अयाचित सेवी अजगरू । डंडळोनि न सांडी धीरू । निधडा निर्धारू पैं त्याचा ॥ २५ ॥ स्वभावें तो मुख पसरी । सहजें पडे जें भीतरीं । सरस नीरस विचारु न करी । आहार अंगीकारी संतोषें ॥ २६ ॥ तैशीच योगियांची गती । सदा भाविती आत्मस्थिती । यदृच्छा आलें तें सेविती । रसआसक्ती सांडूनी ॥ २७ ॥ योगियांचा आहारू घेणें । काय सेविलें हें रसना नेणे । रसनापांगिस्त नाहीं होणें । आहारू सेवणें निजबोधें ॥ २८ ॥ आंबट तिखट तरी जाणे । परी एके स्वादें अवघें खाणें । सरस नीरस कांहीं न म्हणे । गोड करणें निजगोडिये ॥ २९ ॥ मुख पसरलिया निर्धारा । स्वभावें रिघालिया वारा । तोचि आहारू पैं अजगरा । तेणेंचि शरीरा पोषण ॥ ३० ॥ तैशीचि योगियांची स्थिती । वाताशनें सुखें वर्तती । आहारालागुनी पुढिलांप्रती । न ये काकुलती सर्वथा ॥ ३१ ॥ थोडें बहु सरसनिरसासी । हें कांहीं म्हणणें नाहीं त्यासी । स्वभावें जें आलें मुखासी । तें सावकाशीं सेवितू ॥ ३२ ॥

शयीताहानि भूरीणि निराहारोऽनुपक्रमः । यदि नोपनमेद्ग्रासो महाहिरिव दिष्टभुक् ॥ ३ ॥

करितात. म्हणून विषयासक्ति टाकून परमार्थ जोडावा. २३ ‘परंतु केवळ परमार्थपर झाल्यास आहारावांचून शरीर चालणार नाहीं’ असें कोणी म्हणेल म्हणून ही गोष्ट सिद्ध करण्यासाठींच मीं अजगराला गुरु केलें. २४.

—शरीराच्या निर्वाहापुरतें यदृच्छेनें जें अन्नोदक मिळेल त्यावर केवल शरीरपोषण करावें—

आजगरः अक्रियः—अजगरवृत्तीनें उदासीन रहाणाऱ्या योग्यानें, यदृच्छया एव आपतितं सुमृष्टं विरसं महान्तं स्तोकं एव वा ग्रासं ग्रसेत्—दैववशात् प्राप्त झालेल्या अतिशय मिष्ट किंवा नीरस, पुष्कळ किंवा थोड्या अन्नाचें सेवन करावें. [प्रसंगीं जें चांगलें-वाईट, थोडें-फार भक्ष्य मिळेल त्यावर निर्वाह करावा.]२.

अजगर उद्योग केल्यावांचून यदृच्छेनें जें मिळतें तें भक्षण करीत असतो. घाबरून धीर सोडीत नाहीं. त्याचा निश्चय मोठा अढळ असतो. २५ तो साहजिकपणें तोंड उघडितो व त्यांत जें कांहीं पडेल तें सरस, नीरस न पहातां संतोषानें स्वीकारितो. २६ योग्यांची स्थिति अशीच आहे. ते निरंतर आत्मस्वरूपांतच निमग्न असतात. त्यांच्या पुढें जें यदृच्छेनें येईल, त्याच्या चवीची आसक्ति सोडून, तें ग्रहण करितात. २७ योग्यांचा आहार करणें म्हणजे काय खाल्लें तेंच रसनेला न कळणें. अर्थात् जिभेच्या अधीन न होतां आत्मस्वरूपानेंच ते आहार करीत असतात. २८ आंबट, तिखट इत्यादि जरी ते जाणत असले तरी ते सर्व पदार्थ ब्रह्मरसास्वादानेंच सेवितात. सरस, नीरस कांहीं बोलत नाहींत. आत्मसुखाच्या गोडीनें सर्व पदार्थ ते गोडच मानितात. २९ अजगरानें तोंड पसरिलें व त्यांत नुस्ता वारा जरी शिरला तरी तोच त्याचा आहार होतो व त्यानेंच त्याचें शरीरपोषण होतें. ३० तशीच योग्यांची स्थिति असते. ते वायु भक्षण करून खुशाल रहातात. आहारासाठीं कोणाची काकळूत ते कधीं करीत नाहींत. ३१ कमी, अधिक, सरस, नीरस हें बोलणेंच त्यांना कधीं ठाऊक नसतें. सहज जें तोंडाशीं येईल, त्याचें ते स्वस्थपणें सेवन करितात. ३२.

—पण जेव्हां कांहींच मिळत नाहीं तेव्हां काय करावें, तें अवधूत सांगतो—

यदि ग्रासः न उपनमेत् तदा महाहिः इव दिष्टभुक्—जर अन्न मिळालेंच नाहीं तर अजगराप्रमाणें दैवच अन्न आणून देणारें आहे, अशा धैर्यानें, भूरीणि अहानि निराहारः अनुपक्रमः शयीत—पुष्कळ दिवस कांहीं न खातां व कांहीं उद्यम न करितां स्वस्थ पडून रहावें. ३.

अजगरासी बहु काळें । यदृच्छा आहारू न मिळे । तरी धारणेसी न टळे । पडिला लोळे निज-स्थानीं ॥ ३३ ॥ तैसें योगियासी अन्न । बहुकाळें न मिळे जाण । तरी करूनियां लंबासन । निद्रेविण निजतू ॥ ३४ ॥ निद्रा नाहीं तयासी । परी निजे निजीं अहर्निशीं । बाह्य न करी उपायासी । भक्ष्य देहासी अदृष्टें ॥ ३५ ॥ अदृष्टीं असेल जें जे वेळे । तें तें मिळेल तेणें काळें। यालागीं त्याचें ज्ञान न मैळे । धारणा न ढळे निजबोधें ॥ ३६ ॥

ओजःसहोबलयुतं बिभ्रद्देहमकर्मकम् । शयानो वीतनिद्रश्च नेहेतेन्द्रियवानपि ॥ ४ ॥

अजगरासी बळ उदंड । देहो पराक्रमें प्रचंड । परी न करी उद्योगाचें बंड । पसरूनि तोंड पडिलासे ॥ ३७ ॥ तैसाचि योगिया केवळ । शरीरीं असे शारीर बळ । बुद्धिही असे अतिकुशळ । इंद्रि-बळ पटुतर ॥ ३८ ॥ आहारालागीं सर्वथा । हेतु स्फुरों नेदी चित्ता । कायावाचा तत्त्वतां । नेदी स्वभावतां डंडळूं ॥ ३९ ॥ स्वप्नजागृती मुकला । सुषुप्ती सांडोनि निजेला । शून्याचा पासोडा झाडिला । निजीं पहुडला निजत्वें ॥ ४० ॥

मुनिः प्रसन्नगम्भीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः । अनन्तपारो ह्यक्षोभ्यः स्तिमितोद इवार्णवः ॥ ५ ॥

अजगराला दीर्घकालपर्यंत जरी आहार मिळाला नाहीं, तरी तो अस्वस्थ होत नाहीं. आपल्या जागेवर लोळत पडलेला असतो. ३३ त्याचप्रमाणें योग्याला जरी दीर्घकाल अन्न मिळालें नाहीं तरी तो स्वस्थ चित्तानें हातपाय पसरून निद्रेवांचून झोंप घेत असतो. ३४ त्याला वस्तुतः झोंप नसतेच. पण तो समाधिसुखांतच निजत असतो. आहार मिळविण्यासाठीं कसलाच बाह्य उपाय तो करीत नाहीं. दैवयोगानें जें मिळेल तें तो खातो. ३५ जें दैवांत असेल तें त्या वेळीं मिळेल अशा निश्चयानें त्याचें ज्ञान मलीन होत नाहीं व आत्मस्वरूपा-पासून तो ढळत नाहीं. ३६.

—' अहोपण, उद्यमानें अन्न मिळविण्यास समर्थ असतांहि स्वस्थ पडूनच रहावें कीं काय ! ' या प्रश्नाचें ' होय ' असें उत्तर अवधूत देतो—

ओजःसहोबलयुतं अकर्मकं देहं बिभ्रत्—इंद्रियबल, मनोबल, शरीरबल यांनीं युक्त असलेल्याहि देहाला सर्वकर्म-रहितच धारण करणाऱ्या योग्यानें, शयानः एव (भवेत्)—स्वस्थ पडूनच रहावें. वीतनिद्रः च— आणि आपल्या स्वार्थामध्यें दृष्टि ठेवावी. परमार्थाला चुकूं नये. इंद्रियवान् अपि न ईहेत—चक्षुरादि सर्व इंद्रियें समर्थ असूनहि त्यांचें दर्शनादि व्यापारा-पासून निवारण करावें. ४.

अजगराचें सामर्थ्य अचाट, देहपराक्रम प्रचंड, तरीहि तो पोटासाठीं धडपड करीत नाहीं. तोंड पसरून पडलेला असतो. ३७ योग्यालाहि त्याच्याचसारखें शरीरसामर्थ्य असतें. त्याची बुद्धीहि तीव्र असते आणि त्याचें इंद्रियबलहि असामान्य असतें. ३८ तथापि तो आहाराचा विचारहि मनांत येऊं देत नाहीं. देह आणि मन यांना खरोखर तो स्वभावापासून डळमळूं देत नाहीं. ३९ तो स्वप्न व जागृती यांना मुकतो व सुषुप्ति सोडून निजतो आणि शून्याची पासोडी झाडून आत्मज्ञानांत स्वरूपानंदानें शयन करितो. ४०.

——आतां समुद्रापासून आपण काय शिकलों, तें अवधूत सांगतो——

स्तिमितोदः अर्णवः इव— ज्याचें उदक निश्चल आहे अशा समुद्राप्रमाणेंच, मुनिः प्रसन्नगम्भीरः—मुनीनें वरून प्रसन्न व आंत गंभीर, दुर्विगाह्यः—ज्याचें यथार्थ स्वरूप कळणें शक्य नाहीं, कारण त्याचा अभिप्राय गूढ असतो, दुरत्ययः—तेजस्वित्वामुळें ज्याचें उल्लंघन कोणालाहि करितां येत नाहीं, अनंतपारः—आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यामुळें कालतः व देशतः ज्याचा परिच्छेद करितां येत नाहीं म्ह० अमर्याद, अक्षोभ्यः हि—आणि रागादिकांच्या अभावामुळें निर्विकार, अशा गुणांनीं युक्त व्हावें. ५.

समुद्र जो गुरु करणें । त्याचीं परिस पां लक्षणें । गंभीरत्व पूर्णपणें । निर्मळ असणें इत्यादि ॥ ४१ ॥ समुद्र सदा सुप्रसन्न । योगी सदा प्रसन्नवदन । केव्हांही धुसमुशिलेपण । नव्हे जाण निजबोधें ॥ ४२ ॥ मीनल्या सरितांचें समळ जळ । समुद्र डहुळेना अतिनिर्मळ । तैसीं नाना कर्में करितां सकळ । सदा अविकळ योगिया ॥ ४३ ॥ जळें गंभीर सागर । योगिया स्वानुभवें गंभीर । वेळा नुल्लंघी सागर । नुल्लंघी योगीश्वर गुरुआज्ञा ॥ ४४ ॥ समुद्रीं न रिघवे भलत्यासी । तो बुडवी जळ कल्लोळेंसीं । योगिया बुडवी संसारासी । भावें त्यापासीं गेलिया ॥ ४५ ॥ रिगतीमार्गीं जाणें जळीं । तो समुद्रीं करी आंघोळी । येरांसी लाटांच्या कल्लोळीं । कासाकुळी करीतसे ॥ ४६ ॥ तैसीचि योगियांसी । सलगी न करवे भलतियासी । आपभयें भीती अपैसी । तो भाविकांसी सुसेव्य ॥ ४७ ॥ जाल्या धनवंतु वेव्हारा । उपायीं नुल्लंघे सागरा । तैसें नुल्लंघवे योगीश्वरा । नृपां सुरनरां किन्नरां ॥ ४८ ॥ मळु न राहे सागरीं । लाटांसरिसा टाकी दुरी । तैसाचि मळु योगियाभीतरी । ध्यानें निर्धारीं न राहे ॥ ४९ ॥ समुद्रीं मीनली ताम्रपर्णी । तेथ जाली मुक्ताफळांची खाणी । योगिया मिनली श्रद्धा येऊनी । तेथ मुक्तखाणी मुमुक्षां ॥ ५० ॥ जो समुद्रामाजीं रिघोनि राहे । तो नाना परींचीं रत्नें लाहे । योगियांमाजीं जो सामाये । त्याचे वंदिती पाये चिद्रत्नें ॥ ५१ ॥ जैशी समुद्राची मर्यादा । कोणासी न करवे कदा । तैशी योगियांची मर्यादा । शास्त्रां वेदां न करवे ॥ ५२ ॥ प्रवाहेंवीण जळ । समुद्रीं जेवीं निश्चळ । मृत्युभयेंवीण अचंचळ । असे केवळ योगिया ॥ ५३ ॥ समुद्रीं प्रवाहो नव्हे काहीं । सदा पूर्ण ठायींच्या ठायीं । तैसें योगियां जन्ममरण नाहीं । परिपूर्ण पाहीं सर्वदा ॥ ५४ ॥ समुद्रलक्षणें साधितां । अधिक दशा आली हाता । ते योगियाची योग्यता । परीस, तत्त्वतां सांगेन ॥ ५५ ॥ समुद्रामाजीं जळ । लाटांखालीं

आतां ज्या समुद्राला गुरु करावयाचें, त्याचीं लक्षणें ऐक. त्याच्यामध्यें गंभीरपणा व निर्मळपणा पूर्णपणें असावा. ४१ समुद्र सर्वदा सुप्रसन्न असतो. त्याच्यासारखाच योगी सदोदित प्रसन्नवदन असतो. आत्मज्ञानामुळें त्याला केव्हांहि धुसफुस ठाऊक नसते. ४२ सर्व नद्यांचें जल येऊन मिळालें तरी समुद्र गढूळ न होतां सर्वकाळ अतिनिर्मळच रहातो, त्याचप्रमाणें योगी नानाकर्में करीत असूनहि सदोदित त्यांपासून अलिप्तच असतो. ४३ समुद्र जलानें गंभीर असतो. योगी आत्मज्ञानानें गंभीर असतो. सागर आपल्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं. योगीश्वर गुरूची आज्ञा उल्लंघीत नाहीं. ४४ भलत्या माणसाला समुद्रांत शिरतां येत नाहीं, कारण तो पाण्याच्या प्रचंड लाटांनीं त्याला बुडवून टाकितो. ४५ त्याप्रमाणेंच योग्यापाशीं भक्तिभावानें गेल्यास तो संसाराला बुडवून टाकितो. समुद्रांत शिरण्याचा व त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग ज्यास ठाऊक असेल तोच समुद्रांत स्नान करूं शकतो. इतरांना तो समुद्र लाटांच्या उसळींनीं कासावीस करून सोडितो. ४६ त्याचप्रमाणें भलत्याच माणसाला योग्यांशीं स्नेह करवत नाहीं. श्रद्धाळुजनांस मात्र तो सुलभ असतो. ४७ मोठा धनिक झाला तरी त्याला सागराचें उल्लंघन कोणत्याच उपायानें करवत नाहीं. तद्वतच राजे, देव, किन्नर यांना योगीश्वराचें उल्लंघन करवत नाहीं. ४८ समुद्रांत घाण रहात नाहीं. लाटा तिला दूर फेकून देतात. त्याचप्रमाणें योग्यांच्या मनांतहि ध्यानामुळें मलिनता निश्चयानें रहात नाहीं. ४९ ताम्रपर्णी नदी जों समुद्राला जाऊन मिळाली तों ती मोत्याची खाणच बनली, तशीच योग्याला श्रद्धा येऊन मिळतांच ती मुमुक्षूंना मुक्तीची खाणच झाली. ५० जो समुद्रांत बुडी मारून रहातो त्याच्या हातीं नानाप्रकारचीं रत्नें लागतात, त्याचप्रमाणें जो योग्यांशीं समरस होतो त्याच्या पायांवर ज्ञानरत्नें येऊन पडतात. ५१ समुद्राला जशी कोणाला मर्यादा घालितां येत नाहीं, तशीच शास्त्रें व वेद यांनाहि योग्याला मर्यादा घालितां येत नाहीं. ५२ समुद्र जसा प्रवाहरहित निश्चल असतो, तसाच योगीहि मृत्यु टाकून भयरहित होऊन निश्चित असतो. ५३ समुद्र नद्यांसारखा वहात नाहीं, तो जागच्याजागींच पूर्ण असतो, तसेंच योग्यालाहि जन्ममरण नसतें. तो सर्वकाळ परिपूर्ण असतो. ५४ समुद्राच्या व योग्याच्या लक्षणांची तुलना करितां करितां योग्यामध्येंच अधिक विशेष दिसला. म्हणून योग्याची योग्यता तत्त्वतः सांगतों, ती ऐक ५५ समुद्राचें जल

अतिचंचळ । योगिया अंतरीं अतिनिश्चळ । नाहीं तळमळ कल्पना ॥ ५६ ॥ समुद्र क्षोभे वेळोवेळे । योगिया क्षोभेना कवणें काळें । सर्वथा योगी । नुचंबळे । योगबळें सावधु ॥ ५७ ॥ समुद्रीं भरतें पर्वसंबंधें । योगिया परिपूर्ण सदानंदें । समुद्रीं चढुवोहटू चांदें । योगिया निजबोधें सदा सम ॥ ५८ ॥ समुद्र सर्वांप्रति क्षार । तैसा नव्हे योगीश्वर । तो सर्वां जीवांसी मधुर । बोधु साचार पैं त्याचा ॥ ५९ ॥ जयासी बोधु नाहीं पुरता । अनुभवु नेणे निजात्मता । त्यासी कैंची मधुरता । जेवीं अपक्कता सेंदेची ॥ ६० ॥ सागरीं वरुषल्या घन । वृथा जाये तें जीवन । तैसा योगिया नव्हे जाण । सेविल्या व्यर्थपण येवों नेदी ॥ ६१ ॥ अल्पही योगिया होये घेतां । तेणें निवारी भवव्यथा । यालागीं मुमुक्षीं सर्वथा । भगवद्भक्तां भजावें ॥ ६२ ॥

समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः । नोत्सर्पेत न शुष्येत सरिद्भिरिव सागरः ॥ ६ ॥

वर्षाकाळीं सरिता सकळ । घेऊनि आल्या अमूप जळ । तेणें हर्षे हरुषेजेना प्रबळ । न चढे जळ जळाब्धीं ॥ ६३ ॥ ग्रीष्मकाळाचिये प्राप्ती । सरितांचे यावे राहती । ते मानूनियां खंती । अपांपती वोहटेना ॥ ६४ ॥ तैसेचि योगियांच्या ठायीं । नाना समृद्धि आलिया पाहीं । अहंता न धरी देहीं । गर्वु कांहीं चढेना ॥ ६५ ॥ समृद्धि वेंचलिया पाठीं । खंती नाहीं योगिया पोटीं । तो नारायणपरदृष्टी । सुखसंतुष्टी वर्ततू ॥ ६६ ॥ संपत्तीमाजीं असतां । मी संपन्नु हें नाठवे चित्ता । दरिद्र आलिया दरिद्रता । नेणे सर्वथा योगिया ॥ ६७ ॥ दरिद्र आणि संपन्नता । दोन्ही समान त्याचिया चित्ता । नाहीं प्रपंचाची

लाटांच्याखालीं अतिशय चंचल असतें, परंतु योग्याचें अंतःकरण अगदीं शांत असतें. तळमळीची कल्पनाहि त्याच्या मनाला नसते. ५६ समुद्र वरचेवर क्षुब्ध होतो, योग्याला केव्हांहि क्षोभ होत नाहीं. योग्याचें मन कशानेंहि उचंबळत नाहीं, तो योगबलानें नेहमीं सावध असतो. ५७ समुद्राला आमावास्या-पौर्णिमेच्या पर्वकाळींच पूर्ण भरती येते, पण योगी आत्मानंदानें सदा परिपूर्ण असतो. समुद्राला चंद्राच्या उदयास्ताप्रमाणें भरती ओहटी असते, पण योगी आत्मबोधामुळें सर्वदा सम असतो. ५८ समुद्राचें जल सर्वांना खारट लागतें, योगीराज तसा नसतो. तो सर्व जीवांशीं गोड असतो व त्याचें ज्ञान सत्य असतें. ५९ ज्याला पूर्णबोध नसतो व जो अनुभवानें आत्मस्वरूप जाणत नाहीं त्याला कच्च्या शेंदाडाप्रमाणें मधुरता कोठून येणार ! ६० समुद्रांत मेघानें वृष्टि केलेलें जल व्यर्थ जातें, तसें योग्याचें नाहीं. त्याची सेवा केलेली तो कधींहि व्यर्थ जाऊं देत नाहीं. ६१ योग्यानें अल्प जरी स्वीकारिलें तरी तो भक्ताची संसारव्यथा घालवितो. यासाठीं मुमुक्षुनें भगवद्भक्तांस सर्वप्रकारें भजावें. ६२

सरिद्भिः सागरः इव नारायणपरः मुनिः समृद्धकामः हीनः वा न उत्सर्पेत न शुष्येत–वर्षाऋतूंत नद्यांनीं समृद्ध झालेलाहि सागर जसा हृष्ट होत नाहीं व ग्रीष्मऋतूंत नद्यांनीं विहीन झालेलाहि तो सुकून जात नाहीं, त्याप्रमाणें विषयपरायणता सोडून नारायणपरायण झालेल्या मुनीनें सर्व मनोरथसमृद्धि झाली तरी हृष्ट होऊं नये किंवा त्यांचा वियोग झाल्यास शोक करूं नये. ६.

पावसाळ्यांत सर्व नद्या अपार जल घेऊन जरी आल्या तरी समुद्र हर्षानें उचंबळत नाहीं, अथवा समुद्राचें जल चढत नाहीं. ६३ किंवा उन्हाळ्यांत नद्यांचा प्रवाह बंद होतो, तेव्हां त्या चिंतेनें तो समुद्रराज सुकत नाहीं. ६४ त्याचप्रमाणें योग्याजवळ नानाप्रकारचें ऐश्वर्य चालून आलें तरी तो त्याचा अभिमान धरीत नाहीं, किंवा यत्किंचित गर्व बाळगीत नाहीं. ६५ व तें नाहींसें झालें तरी त्याचा खेद मानीत नाहीं. तो नारायणपरदृष्टीनें सुखानें संतुष्ट होऊन रहातो. ६६ संपन्नस्थितींत असला तर 'मी धनिक' असें त्याच्या मनाला वाटत नाहीं. गरिबी आली तरी योग्याला दारिद्र्य कधीं ठाऊकच नसतें. ६७ दारिद्र्य व श्रीमंती या दोन्ही अवस्था त्याच्या मनाला सारख्याच वाटत

आसक्तता। नारायणपर तत्त्वतां निजबोधें ॥ ६८ ॥ या प्रपंचाचा कठिण लागू। नाशाशीं मूळ स्त्रीसंगू। येचिविषीं गुरु पतंगू। केला चांगू परियेसीं ॥ ६९ ॥

दृष्ट्वा स्त्रियं देवमायां तद्भावैरजितेन्द्रियः। प्रलोभितः पतत्यन्धे तमस्यग्नौ पतङ्गवत् ॥ ७ ॥

दैवी गुणमयी जे माया। तिचें सगुणस्वरूप त्या स्त्रिया। तेथ प्रलोभ उपजला प्राणियां। भोग भोगावया स्त्रीसुखें ॥ ७० ॥ हावभावविलासगुणीं। व्यंकट कटाक्षांच्या बाणीं। पुरुषधैर्यकवच भेदोनी। हृदयभवनीं संचरती ॥ ७१ ॥ दारुण कटाक्षांच्या घायीं। पुरुषधैर्य पाडिलें ठायीं। योषितावंदीं पाडिले पाहीं। भोगकारागृहीं घातले ॥ ७२ ॥ स्त्रीभोगाचें जें सुख। तें जाण पां केवळ दुःख। तोंडीं घालितां मधुर विख। परिपाकीं देख प्राणांतू ॥ ७३ ॥ दीपाचिया अंगसंगा। कोण सुख आहे पतंगा। बळें आलिंगूं जातां पैं गा। मरणमार्गा लागले ॥ ७४ ॥ पुढिला पतंग निमाला देखती। तरी मागिल्यां दीपीं अतिआसक्ती। तेवीं स्त्रीकामें एक ठकती। एकां अतिप्रीती पतंगन्यायें ॥ ७५ ॥ तेवीं विवेकहीन मूर्खा। लालुप्य उपजे स्त्रीसुखा। तत्संसर्गें मरण लोकां। न चुके देखा सर्वथा ॥ ७६ ॥ दीपरूपाचेनि कोडें। पतंग जळोनि स्नेहीं बुडे। तेवीं स्त्रीसंगें अवश्य घडे। पतन रोकडें अंधतमीं ॥ ७७ ॥

असतात. त्याला प्रपंचाची आसक्ति नसते. तो आत्मबोधानें खरोखर नारायणस्वरूपच झालेला असतो. ६८ या प्रपंचाचा संबंध फार कठिण आहे. स्त्रीसंग हें नाशाचें मूळ आहे. याविषयीं मीं पतंगाला चांगला गुरु केलें. तेंच आतां ऐक. ६९.

—रूप, गंध, स्पर्श, शब्द आणि रस या पांच विषयांनीं अनुक्रमें मोहित झालेले पतंग, मधुकर, हत्ति, हरिण व मासा हे पांचजण मृत्युमुखांत पडले. यास्तव विषयांमध्यें आसक्त होऊं नये. याविषयीं मी या पांचजणांना गुरू केलें. त्यांतील रूपविलासांत मोहित झालेला जीव कसा नाश पावतो हें मी पतंगापासून शिकलों, असें अवधूत सांगतो—

देवमायां स्त्रियं दृष्ट्वा तद्भावैः प्रलोभितः अजितेंद्रियः-देवाची माया अशी जी स्त्री तिला पाहून तिच्या हावभावांनीं लुब्ध झालेला अजितेंद्रिय विषयीं पुरुष, अग्नौ पतंगवत् अन्धे तमसि पतति-अग्नीच्या रूपावर आसक्त झालेल्या पतंगाप्रमाणें भयंकर अज्ञानांधकारांत पडतो. ७.

दैवी गुणमयी म्ह० सत्त्वादिगुणसाम्यावस्थारूप जी माया तिचें सगुणरूप त्याच स्त्रिया होत. प्राण्यांच्या मनांत स्त्रीसुख भोगण्याचा लोभ उत्पन्न झाला कीं, ७० स्त्रिया हाव-भाव-विलास इत्यादि प्रकारांनीं, वक्रदृष्टीनें-कटाक्षद्वारां (किंवा हाव-भाव-विलासरूपी धनुष्यानें—कटाक्षरूपी बाणांनीं) पुरुषाच्या धैर्यरूपी कवचाचा भेद करून त्याच्या हृदयमंदिरांत प्रवेश करितात. ७१ भयंकर कटाक्षाचा प्रहार करून पुरुषाचें धैर्य जागच्याजागीं खचवून त्याला स्त्रीरूपी बंधानें बांधून भोगरूपी कारागृहांत घालितात. ७२ स्त्रीभोगाचें सुख खरोखर निव्वळ दुःखच आहे. विष तोंडांत घालतेवेळीं मधुर लागतें, पण परिणामीं प्राण घेतें. ७३ (सु. गी. १८–३८ पृ. ३३१) दिव्याला आलिंगन देण्यांत पतंगाला कोण सुख वाटत असतें ! पण त्याला बळेंच बिलगतांक्षणींच तो मृत्युपंथाला लागतो. ७४ पुढला पतंग मरून पडलेला पहात असतांहि मागल्याची दिव्यावर झडप घालण्याची अत्यंत आसक्ति असतेच. त्याचप्रमाणें स्त्रीसंगानें एक फसलेला पाहिला, तरी दुसरा या पतंगन्यायानें स्त्रीवर आसक्ति ठेवितो. ७५ तसेंच विवेकहीन मूर्खांच्या मनांतहि स्त्रीविषयीं लालसा उत्पन्न होते, पण त्यांच्या संसर्गानें लोकांना प्राप्त होणारे मरण कधींहि चुकत नाहीं. ७६ दिव्याच्या रूपाला भाळून पतंग जळून तेलांत बुडतो, त्याचप्रमाणें स्त्रीसंगानें पुरुषाचा अवश्य अधःपात होतो. ७७.

योषिद्धिरण्याभरणाम्बरादिद्रव्येषु मायारचितेषु मूढः ।
प्रलोभितात्मा ह्युपभोगबुद्ध्या पतङ्गवन्नश्यति नष्टदृष्टिः ॥ ८ ॥

पहा पां कांता आणि सोनें । वस्त्रें आभरणें रत्नें । मायेनें रचिलीं पडणें । पतनाकारणें जनांच्या ॥ ७८ ॥ एकली योषिता नरकीं घाली । सुवर्णलोभें नरकु बळी । रत्नें भूषणें तत्काळीं । नरकमेळीं घालिती ॥ ७९ ॥ ते अवघेचि अनर्थकारी । मीनले योषिताशरीरीं । ते देखतांचि पुरंध्री । जनांसी उरी मग कैंचेनी ॥ ८० ॥ अंगीं वेताळसंचारा । त्यावरी पाजिलिया मदिरा । मग डुल्लत नाचतां त्या नरा । वोढावारा पैं नाहीं ॥ ८१ ॥ कां भांडाचे तोंडीं भंडपुराण । त्यावरी आला शिमग्याचा सण । मग करितां वाग्विटंबन । आवरी कोण तयासी ॥ ८२ ॥ हो कां मोहक मदिरा सर्वांसी । त्यांतु घातलें उन्मादद्रव्यासी । सेवन करितां त्या रसासी । पारु भ्रमासी पैं नाहीं ॥ ८३ ॥ तैसें सोलिव मोहाचें रूप । तें जाण योषितास्वरूप । त्याहीवरी खटाटोप । वस्त्रें पडप भूषणें ॥ ८४ ॥ काजळ कुंकू अलंकार । घेऊनि विचित्र पाटांबर । वनिता शोभत सुंदर । मायेचे विकार विकारले ॥ ८५ ॥ माया अजितेंद्रिया बाधी । दासांसंमुख नव्हे त्रिशुद्धी । ज्याची अतिप्रीति गोविंदीं । त्यासी कृपानिधि रक्षिता ॥ ८६ ॥ कैशा रीतीं रक्षी भक्त । मुळीं आत्मा आत्मी नाहीं तेथ । स्त्रीरूपें भासे भगवंत । भक्त रक्षित निजबोधें ॥ ८७ ॥ वनिता देखोनि गोमटी । विवेकाची होय नष्ट दृष्टी । प्रलोभें उपभोगा देती मिठी । ते दुःखकोटी भोगिती ॥ ८८ ॥ देखोनि दीपरूपीं झगमगी । उपभोगबुद्धि पतंगीं । उडी घालितां वेगीं । जळोनि आगीं नासती ॥ ८९ ॥ एवं योषितारूपें माया । उपभोग भुलवी प्राणियां । जे विमुख हरीच्या

—स्त्रीच्या उदाहरणानें अवधूत हाच अर्थ अधिक विशद करितो—

मायारचितेषु योषित्-हिरण्य-आभरण-अंबरादिद्रव्येषु—मायेनें रचिलेल्या स्त्री, सुवर्ण, अलंकार, वस्त्रें इत्यादि द्रव्यामध्यें, **मूढः**—आसक्त झालेला, उपभोगबुद्ध्या—उपभोगबुद्धीनें, प्रलोभितात्मा **नष्टदृष्टिः**—ज्यांचें चित्त त्यांत अत्यंत लुब्ध झालें आहे व त्यामुळेंच ज्याची विवेकबुद्धि नष्ट झाली आहे असा पुरुष, **पतंगवत् नश्यति**—पतंगाप्रमाणें नाश पावतो. ८.

स्त्रिया, सोनें, वस्त्र, भूषणें व रत्नें हे सर्व लोकांच्या पतनासाठीं मायेनें रचिलेले पाश आहेत. ७८ पहा ! एक स्त्रीच आधीं नरकांत लोटिते. सोन्याचा लोभ तर महानरक. रत्नें, भूषणें तर तत्काळ नरककुंडांत नेऊन टाकितात. ७९ हे सर्व अनर्थ स्त्रीशरीरांत एकवटले आहेत. मग नागरीक स्त्री दृष्टीस पडतांच लोकांना विधिनिषेध काय रहाणार ! ८० आधींच अंगांत वेताळाचा संचार झालेला असावा व त्यांत आणखी मद्यप्राशन करवावें, म्हणजे मग त्या माणसाच्या डुलण्याला व नाचण्याला कांहीं मर्यादा रहात नाहीं. ८१ किंवा भाटाच्या तोंडीं भंडपुराण असावें, त्यांत शिमग्याचा सण यावा, म्हणजे त्याच्या त्या वाग्विडंबनेला कोण आवरूं शकणार ! ८२ किंवा मदिरा मूळचीच सर्वांना मोह पाडणारी, त्यांत आणखी मादक द्रव्यें घातलीं, म्हणजे तें पेय प्राशन करणाराच्या भ्रमाला सीमाच रहात नाहीं, ८३ त्याचप्रमाणें गाळीव मोहाचें जें रूप तेंच स्त्रीचें स्वरूप. त्यांत आणखी वस्त्रें, प्रावरणें, भूषणें यांची भर पडली ८४ म्हणजे काजळ, कुंकूं, अलंकार व रंगीबेरंगी उंचीं वस्त्रें यांनीं स्त्री अत्यंत सुंदर दिसूं लागते. तिच्यांत मायेचे विकार पसरलेले असतात ८५ व ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन नसतात त्यांना ती माया बाधिते. पण भक्तांच्या पुढें ती कधींहि उभी रहात नाहीं. कारण ज्यांची गोविंदावर अत्यंत श्रद्धा असते त्यांचा तो कृपानिधि रक्षणकर्ता होतो. ८६ भगवान् भक्ताचें रक्षण कसें करितो म्हणून म्हणशील, तर सांगतों. मुळांत पुरुषांमध्यें आत्मा व स्त्रीमध्यें आत्मी असा भेद नाहीं. त्यामुळें स्त्रीरूपानें भगवंतच भक्तांना भासतो व आत्मज्ञानानें भक्तांचें रक्षण करितो. ८७ सुंदर स्त्री पाहून ज्यांची विवेकदृष्टि नष्ट होते व आसक्तीनें जे भोगांत लुब्ध होतात ते कोट्यावधि दुःखें भोगितात. ८८ दिव्याचें झगझगीत रूप पाहून त्यावर पतंग उपभोगलालसेनें वेगानें उडी टाकितात आणि आगींत जळून नष्ट होतात. ८९ याप्रमाणें स्त्रीरूपानें माया प्राण्यांना उपभोगाच्या लालसेनें भुलविते. जे हरिचरणा-

पायां । त्यांसीच माया भुलवितु ॥ ९० ॥ मधुकरीचेनि बिंदाणें । मधुकर म्यां करणें । दुःख नेदितां कार्य साधणें । तींही लक्षणें परिस पां ॥ ९१ ॥

स्तोकं स्तोकं ग्रसेद्ग्रासं देहो वर्तेत यावता । गृहानहिंसन्नातिष्ठेद्वृत्तिं माधुकरीं मुनिः ॥ ९ ॥

भ्रमरु रिघोनि पुष्पामधीं । फूल तरी कुचंबों नेदी । आपुली करी अर्थसिद्धी । चोखट बुद्धि भ्रमराची ॥ ९२ ॥ तैशीच योगियांची परी । ग्रासमात्र घरोघरीं । भिक्षा करूनि उदर भरी । पीडा न करी गृहस्थां ॥ ९३ ॥ प्राणधारणेंपुरतें । योगी मागे भिक्षेतें । समर्थ दुर्बळ विभागातें । न मनूनि चित्तें सर्वथा ॥ ९४ ॥ रिघोनि कमळिणीपाशीं । भ्रमरु लोभला आमोदासी । पद्म संकोचे अस्तासी । तेंचि भ्रमरासी बंधन ॥ ९५ ॥ जो कोरडें काष्ठ भेदोनि जाये । तो कमळदळीं गुंतला ठाये । प्रिया दुखवेल म्हणोनि राहे । निर्गमु न पाहे आपुला ॥ ९६ ॥ तैसाचि जाण संन्यासी । एके ठायीं राहे लोलुप्येंसीं । तेंचि बंधन होये त्यासी । विषयलोभासी गुंतला ॥ ९७ ॥

अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः । सर्वतः सारमादद्यात्पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ १० ॥

अतिलहान सुमन जें कांहीं । भ्रमरा तेथ उपेक्षा नाहीं । रिघोनि त्याच्याही ठायीं । आमोद पाहीं सेवितु ॥ ९८ ॥ थोरथोरा ज्या कमळिणी । विकासल्या समर्थपणीं । त्यांच्याही ठायीं रिघोनी ।

पासून विमुख होतात त्यांनाच ती माया भुरळ घालिते. ९० आतां मीं भ्रमरास त्याच्या मधुकरीवृत्तीवरून गुरु कसें केलें व इतरांस दुःख न देतां आपलें कार्य कसें साधावें, तें ऐक. ९१.

—भ्रमरापासून आपण काय शिकलों, तें अवधूत सांगतो—

मुनिः गृहान् अहिंसन् यावता देहः वर्तेत तावता स्तोकं स्तोकं ग्रासं ग्रसेत्—योग्यानें गृहस्थांना पीडा न देतां जेवढ्या अन्नानें देहाचा निर्वाह होईल तेवढेंच म्ह० प्रत्येक गृहांतून थोड्या थोड्या ग्रासाचें ग्रहण करावें, **माधुकरीं वृत्तिं आतिष्ठेत्**—याप्रमाणें भ्रमराच्या वृत्तीचा आश्रय करावा. [याचा आशय असा—ज्याप्रमाणें विशिष्ट गंधाच्या लोभानें एकाच कमलामध्यें रहाणारा भ्रमर सूर्यास्तसमयीं तें कमल मिटलें असतां त्यांत अडकून पडतो, त्याप्रमाणें मुनीहि गुणाच्या लोभानें एकाच गृहाचा आश्रय करून राहिल्यास त्याच्या मोहानें बद्ध होतो. म्हणून तसें न करितां मधमाशी जशी प्रत्येक पुष्पांतून थोडा थोडा मध घेते, तसेंच योग्यानें गृहस्थांपासून थोडें थोडें अन्न घ्यावें. ९.

भ्रमर फुलांत शिरतो पण तें फूल चुरगळीत नाहीं आणि आपलें कार्य तर साधितो. भ्रमराची अशी सद्बुद्धि असते. ९२ तशीच योग्याची पद्धति आहे. तो घरोघर हिंडून घांसभर अन्नाची भिक्षा मागून निर्वाह करतो. गृहस्थांना त्रासदायक होत नाहीं. ९३ बलाढ्य किंवा दुबळा हा भेदभाव सर्वथा मनांत न आणितां योगी केवल प्राणरक्षणापुरतीच भिक्षा मागतो. ९४ भ्रमर कमलिनींत शिरला असतां तिच्या सुगंधावर लुब्ध होतो व सायंकाळीं तें कमल मिटतांच त्याला तें बंधन होतें. ९५ जो भ्रमर कठिण लांकडाचाहि भेद करितो तोच त्या कमलदलांत अडकून पडतो. आपली प्रियसखी दुखावेल म्हणून त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधीत नाहीं. ९६ त्याचप्रमाणें संन्यासी एकाच जागीं आसक्त होऊन बसला तर तेंच स्थल त्याला बंधक होतें. कारण तो विषयांच्या लोभांत गुंततो. ९७.

—हाच अर्थ अवधूत अधिक स्पष्ट करितो—

पुष्पेभ्य षट्पदः इव—पुष्पांपासून मधमाशी जशी सार ग्रहण करिते त्याचप्रमाणें, **कुशलः नरः अणुभ्यः च महद्भ्यः शास्त्रेभ्यः**—विवेकी पुरुषानें लहान-मोठ्या शास्त्रांपासून, **सर्वतः सारं आदद्यात्**—सर्वतः सार ग्रहण करावें. १०.

भ्रमर बकुळासारख्या अगदीं लहान पुष्पाचीहि उपेक्षा करीत नाहीं. तर त्यांतहि शिरून तो सुगंध सेवीत असतो. ९८ आणि पूर्ण उमललेल्या मोठमोठ्या कमलिनीमध्येंहि जाऊन त्यांतील ग्राह्यांश सेवन करितो. ९९ त्याच-

सारांश सेवुनी जातसे ॥ ९९ ॥ तैसाचि योगिया नेटकू । शास्त्रदृष्टी अतिविवेकू । न करी लहान थार तर्कू । सारग्राहकू होतसे ॥ १०० ॥ वेदांतीं ब्रह्मस्थिती । बोलिली मानी यथानिगुती । इतर स्तोत्रीं ब्रह्मव्युत्पत्ती । तेही अतिप्रीतीं मानितू ॥ १ ॥ पंडितांचें वचन मानी । साधारणु बोलिला हितवचनीं । तेंही अतिआदरें मानुनी । सार निवडुनी घेतसें ॥ २ ॥ प्रीति होआवी पतीच्या मानसीं । कुळवधू मानी सासुसासऱ्यांसी । मान देतसे त्यांच्या दासासी । तेचि प्रीतीसी लक्षुनी ॥ ३ ॥ भेंसळल्या क्षीरनीरासी । निवडूनि घेइजे राजहंसीं । तैसा विवेकयुक्त मानसीं । सारभागासी घेतसे ॥ ४ ॥ सर्वभूतीं भगवद्भावो । हा सारभागु मुख्य पहाहो । हे निष्ठा ज्यासी महाबाहो । त्यासी अपावो स्वप्नीं नाहीं ॥ ५ ॥ भरलेल्या जगाआंतू । सारभागी तो योगयुक्तु । यदूसी अवधूत सांगतु । गुरुवृत्तान्तु लक्षणें ॥ ६ ॥ गुरुत्वें म्यां मानिली माशी । ऐक राया दों प्रकारेंसीं । एक ते मोहोळमासी । ग्रामवासी दूसरी ॥ ७ ॥

सायंतनं श्वस्तनं वा न सङ्गृह्णीत भिक्षितम् । पाणिपात्रोदरामत्रो मक्षिकेव न सङ्ग्रही ॥ ११ ॥

पहा पां घरींची माशी । बैसल्या साखरेचे राशीं । हातीं धरोनि घाली मुखाशीं । संग्रहो तिसी पैं नाहीं ॥ ८ ॥ हे होईल सायंकाळां । हे भक्षीन प्रातःकाळां । ऐसा संग्रहो वेगळा । नाहीं केला मक्षिका ॥ ९ ॥ तैशी योगसंन्यासगती । प्राप्तभिक्षा घेऊनी हातीं । तिशीं निक्षेपु मुखाप्रती । संग्रहस्थिति त्या नाहीं ॥ ११० ॥ भिक्षेलागीं पाणिपात्र । सांठवण उदरमात्र । या वेगळें स्वतंत्र । नाहीं घरपात्र सांठवणें ॥ ११ ॥

प्रमाणें शास्त्रदृष्टि, अतिविवेकी योगी हें लहान शास्त्र आहे व हें मोठें आहे, असा तर्क करीत बसत नाहीं. सर्वांतील सार तेवढें घेत असतो. १०० फार मोठ्या वेदान्तशास्त्रांत सांगितलेली ब्राह्यस्थिति तो प्रमाण मानितो आणि इतर लहानशा स्तोत्रादिकांतील ब्रह्माची व्युत्पत्ति मोठ्या प्रेमानें खरी मानितो. १ पंडिताचें वचन जसें मान्य करितो, त्याचप्रमाणें एखादा सामान्य मनुष्य हितवचन बोलल्यास, किंवा त्यानें सांगितल्यास त्याचेंहि मोठ्या आदरानें ग्रहण करून सर्वांचें सार निवडून घेतो. २ पतीच्या मनांत आपल्याविषयीं प्रेम रहावें म्हणून कुलवधू जशी सासु-सासऱ्यांना मान देते, इतकेंच केवल नाहीं तर त्यांच्या नोकरांचेंहि अगत्य ठेविते, ३ राजहंस जसा जलमिश्रित दुधांतील केवळ दुधाचेंच सेवन करितो, तसाच योगी विवेकयुक्त मनानें सर्वांतील सार तेवढें ग्रहण करितो. ४ सर्व प्राण्यांत भगवद्भाव पहाणें हाच सर्वांतील मुख्य सारभाग आहे असें जाणावें. हे पराक्रमी राजा ! ज्याची अशी भावना असते त्याला स्वप्नांतहि अपाय होत नाहीं. ५ या भरलेल्या जगांतून हें सार घेणारा खरा योगी होय. आतां अवधूत यदूला गुरूच्या वृत्तांताची लक्षणें सांगतो. ६ तीं हे राजा ऐक ! मी दोनप्रकारच्या माशा गुरु केल्या. एक मधमाशी व दुसरी घरांतली माशी. १०७.

—भ्रमर दोन प्रकारचा आहे. एक पुष्पापासून मध आकर्षण करून घेतो व दुसरा साक्षात् मधाला तयार करितो व तोच खातो. त्यांतील पहिल्याला भ्रमर म्हणतात व दुसऱ्याला मधुमक्षिका म्हणतात. त्यांपैकीं भ्रमरापासून आपण काय शिकलों, तें अवधूतानें सांगितलें. आतां मक्षिकेपासून काय शिकलों, तें सांगतो—

भिक्षितं सायंतनं स्वस्तनं वा न सङ्गृह्णीत—भिक्षा मागून आणलेलें अन्न ' हें संध्याकाळासाठीं व हें उद्यासाठीं ' असें म्हणून सांठवून ठेऊं नये. तर, **पाणिपात्रः उदरामत्रः वा भवेत्**—हात याच पात्रामध्यें किंवा उदर याच पात्रामध्यें तें ठेवावें. [उदरभरणास पुरेसें अन्न एकाच घरीं मिळाल्यास तें तेथेंच भक्षण करावें व घरोघर ग्रासमात्र अन्न मिळाल्यास तें पुरेसें मिळेपर्यंत हातांत घ्यावें. **सङ्ग्रही मक्षिका इव न भवति**—कारण संग्रह करणारा भिक्षु मक्षिकेप्रमाणें जीवाला मुकतो. ११.

घरांतली साधी माशी पहा ! ती साखरेच्या राशीवर बसली कीं, एकेक कण तोंडांत घालीत असते. तिला संग्रह ठाऊक नाहीं. ८ हें संध्याकाळसाठीं, हें उद्यां सकाळला होईल, असा निराळा संग्रह माशी कधींच करीत नाहीं. ९ योगसंन्याशाची स्थिति तशीच असते. तो मिळालेली भिक्षा हातांत घेऊन ती तोंडांत टाकितो. संग्रहाचें नांव नाहीं. ११० हात हेंच त्याचें भिक्षपात्र व पोट हेंच संग्रहस्थल. यांवांचून दुसरें स्वतंत्र घर किंवा भांडें असें दुसरें सांठवण त्याच्यापाशीं नसतें. १११.

सायंतनं श्वस्तनं वा न सङ्गृह्णीत भिक्षुकः । मक्षिका इव सङ्गृह्णन सह तेन विनश्यति ॥ १२ ॥

सायंकाळप्रातःकाळासी । भक्ष्यसंग्रहो नसावा भिक्षूसी । संग्रहें पावती नाशासी । येविषीं मधुमाशी गुरु केली ॥ १२ ॥ रिघोनि नाना संकटस्थानांसी । मधुसंग्रहो करी मधुमाशी । तो संग्रहोचि करी घातासी । मधु न्यावयासी जैं येती ॥ १३ ॥ संग्रहो यत्नाचिया चाडा । मोहळ बांधिती अवघडां कडां । ते दुर्गमीं रिगू करिती गाढा । अर्थचाडा मधुहर्ते ॥ १४ ॥ कां झाडितां मोहळासी । नाशु होतसे माशियांसी । संग्रहाची जाती ऐसी । जीवघातासी करवितु ॥ १५ ॥ ऐसें देखोनियां जनीं । भक्तभिक्षुकयोगिसज्जनीं । संग्रहो न करावा भरंवसेनी । नाशु निदानीं दिसुतसे ॥ १६ ॥ आचरावें सत्कर्म । संग्रहावा शुद्ध धर्म । हेंचि नेणोनियां वर्म । धनकामें अधम नाशती ॥ १७ ॥ अर्थ विनाशाचें फळ । दुसरें नाशाचें मूळ । विशेष नाशाचें आहळबाहळ । स्त्री केवळ वोळख पां ॥ १८ ॥ मूळनाशासी जीविता । कनक आणि योषिता । जंव जंव यांची आसक्तता । तंव तंव चढता भवरोगू ॥ १९ ॥ कनक आणि कामिनी । ज्यासी नावडे मनींहुनी । तोचि जनार्दनी जनीं । भरंवसेनी वोळख पां ॥ १२० ॥ जो सुख इच्छील आपणासी । तेणें नातळावें स्त्रियेसी । येचिविषयीं मदगजासी । गुरु विशेषीं म्यां केला ॥ २१ ॥

पदापि युवतीं भिक्षुर्न स्पृशेद्दारवीमपि । स्पृशन्करीव बद्ध्येत करिण्या अङ्गसङ्गतः ॥ १३ ॥

—अवधूत पुनः याचेंच विवरण करितो—

भिक्षुकः सायंतनं श्वस्तनं वा संङ्गृहीत–भिक्षुकानें संध्याकाळचें किंवा सकाळचें म्हणून कांहीं संग्रह करून ठेवूं नये. कारण, **सङ्गृह्णन् मक्षिकाः इव तेन सह विनश्यति**–संग्रह करणारा भिक्षुक मधमाशीप्रमाणें त्या संग्रहीत वस्तूसह विनाश पावतो. १२.

भिक्षूला सकाळ-सायंकाळासाठीं अन्नसंग्रह नसावा. कारण संग्रह केल्यानें तो नाश पावतो. मीं याविषयीं मधमाशीला गुरु केलें. १२ अनेक प्रकारच्या अवघड जागीं हिंडून मधमाशी मधसंग्रह करिते. पण मधाचें पोळें न्यावयास जेव्हां लोक येतात तेव्हां तो संग्रहच तिच्या नाशास कारण होतो. १३ मोठ्या प्रयत्नानें जमविलेला मधुसंग्रह सुरक्षित रहावा या इच्छेनें ती अवघड अशा कड्यावर मोहोळ बांधिते. अशा अवघड जागींहि मध हरण करणारे लोक शिरकाव करितात. १४ आणि तें मोहोळ पाडून झाडिलें कीं सर्व माशांचा नाश होतो. याप्रकारें संग्रहाची पद्धति प्राणघातक होते, १५ हें जाणून भक्त, भिक्षू, योगी व सज्जन यांनीं संग्रहावर विश्वास ठेवूं नये. कारण त्यांत शेवटीं नाश स्पष्ट दिसतोच. १६ सत्कर्म आचरावें, शुद्ध धर्माचा संग्रह करावा, हें रहस्य न जाणतां द्रव्यलालसेनें अधमांचा नाश होतो. १७ कांहीं अर्थविनाशाचें फल असतें व कांहीं नाशाचें मूळ असतें. पण स्त्री हें विशेष नाशाचें अळेंच आहे, असें तूं समज. १८ याप्रमाणें कनक आणि कांता हें जीविताच्या नाशाचें मूळ कारण आहे. पुरुष जों जों त्यांत आसक्त होतो तों तों त्याचा भवरोग वाढत जातो. १९ ज्याला द्रव्य आणि दारा यांचा मनापासून तिटकारा आहे तोच जनीं जनार्दन होय, असें खात्रीनें जाण. १२० ज्याला आत्मसुखाची इच्छा असेल त्यानें स्त्रीशीं संबंध ठेवूं नये. याविषयीं मीं मत्त हत्तीला गुरु केलें. १२१.

—' स्पर्श या विषयांतील आसक्ति नाशाला कारण होते , हें मी हत्तीपासून शिकलों, असें अवधूत सांगतो—

भिक्षुः युवतिं दारवीं अपि पदा अपि न स्पृशेत्–भिक्षूनें तरुण स्त्रीला, मग ती काष्ठाची केलेली बाहुली जरी असली तरी तिला पायानेंहि स्पर्श करूं नये. कारण, **स्पृशन् करिण्याः अङ्गसङ्गतः करी इव बद्ध्येत**–स्त्रीला स्पर्श करणारा भिक्षु हत्तिणीच्या अंगस्पर्शाच्या आसक्तीनें हत्तीप्रमाणें बद्ध होतो. [वनगजाला हत्तीण दाखवून, तिच्या आसक्तीनें त्याला जवळच खोल खणलेल्या व तोंड झाकून ठेवलेल्या खड्ड्यांत पाडवून बद्ध करितात, हें प्रसिद्ध आहे.] १३.

पहा पां षष्टिहायन भद्रजाती । त्यापुढें मनुष्य तें किती । ते हस्तिणीचे अंगसंगतीं । बंधन पावती मनुजांचें ॥ २२ ॥ जो दृष्टीं नाणी मनुष्यांसी । तो स्त्रियीं वश केला मानवांसी । त्याचोनि बोलें उठी बैशी । माथां अंकुशीं मारिजे ॥ २३ ॥ एवं जिणावया संसारासी । जे स्वधर्मनिष्ठ संन्यासी । तिंहीं देखोनियां योषितांसी । लागवेगेंसीं पळावें ॥ २४ ॥ नको स्त्रियांची भेटी । नको स्त्रियांसीं गोष्टी । स्त्री देखतांचि दिठीं । उठाउठी पळावें ॥ २५ ॥ पळतां पळतां पायांतळीं । आल्या काष्ठाची पुतळी । तेही नातळावी कुशळीं । निर्जीव स्त्री छळी पुरुषातें ॥ २६ ॥ अनिरुद्धें स्वप्नीं देखिली उखा । तो धरूनि नेला चित्ररेखा । बाणासुरें बांधिला देखा । कृष्ण सखा जयाचा ॥ २७ ॥ त्यासी सोडवणेलागीं हरी । धांवतां आडवा आला कामारी । युद्ध जालें परस्परीं । शस्त्रास्त्रीं दारुण ॥ २८ ॥ एवं हरिहरां भिडतां । जो बांधला स्वप्नींचिया कांता । तो सहसा न सुटेचि शोचितां । इतरांची कथा कायसी ॥ २९ ॥ पहां पां स्वप्नींचिया कांता । अनिरुद्धासी केली निरुद्धता । मा साचचि स्त्री हातीं धरितां । निर्गमता त्या कैंची ॥ १३० ॥ पुरुष आपणया म्हणविती । शेखीं स्त्रियांचे पाय धरिती । त्यांसी कैसेनि होईल मुक्ती । स्त्रीसंगतीं अधःपात ॥ ३१ ॥

नाधिगच्छेत्स्त्रियं प्राज्ञः कर्हिचिन्मृत्युमात्मनः । बलाधिकैः स हन्येत गजैरन्यैर्गजो यथा ॥ १४ ॥

क्रीडतां गजींमाजी गजपती । त्यावरी सबळ भद्रजाती । येऊनियां युद्ध करिती । निजबळें मारिती तयातें ॥ ३२ ॥ तो मारूनियां हस्ती । त्या हस्तिणी समस्ती । सबळ भोगी भद्रजाती । नाशाप्रती स्त्री मूळ ॥ ३३ ॥ अहल्येचिया संगतीं । गौतमें विटंबिला अमरपती । भस्मासुरासी नाशप्राप्ती ।

अहो ! साठ वर्षें जगणाऱ्या हत्तीच्या पुढें मनुष्याचें बळ तें काय ! पण हत्तीणीच्या स्पर्शानें ते मनुष्याच्या बंधनांत सांपडतात. २२ जो हत्ती माणसाला आपल्या दृष्टीपुढेंहि उभा राहूं देत नाहीं त्याच हत्तीला हत्तीण मनुष्याच्या वश करविते आणि मग त्यानें ऊठ म्हटलें कीं तो उठतो व बैस म्हटलें कीं बसतो, इतका तो मनुष्याच्या आज्ञेंत राहून वर अंकुशाचा मारहि सहन करितो. २३ यासाठीं स्वधर्मनिष्ठ संन्याशांनीं संसार जिंकण्यासाठीं स्त्री दृष्टीस पडतांच लगेच पळ काढावा. २४ स्त्रियांची भेट नको, त्यांच्याशीं भाषण नको, त्यांचें दर्शन नको, त्यांना पहातांच तत्काळ पळत सुटावें. २५ पळतां पळतां पायाखालीं जर एखादी लाकडाची बाहुली आली तर शहाण्या माणसांनीं तिलाहि स्पर्श करूं नये. कारण निर्जीव स्त्री देखील पुरुषांना छळिते. २६ अनिरुद्ध व उषा यांची स्वप्नांत भेट झाली, पण तेवढ्यावरून चित्ररेखेनें त्याला धरून नेलें आणि कृष्ण ज्याचा सखा आहे त्याला बाणासुरानें बांधून ठेविलें. २७ त्याला सोडविण्यासाठीं हरि धांवत गेला. तों शंकरानें येऊन त्याला अडविलें. तेव्हां त्या दोघांचें शस्त्रास्त्रांनीं मोठें भयंकर युद्ध झालें. २८ याप्रमाणें त्याला सोडविण्यासाठीं हरिहर भिडलें, पण इतका प्रयत्न करूनहि स्वप्नांतील स्त्रीनें बांधिलेल्या अनिरुद्धाची सुटका झाली नाहींच. तेव्हां सामान्य जनांची काय कथा ! २९ पहा, स्वप्नांतील स्त्रीनें अनिरुद्धाला म्ह० बंधरहितालाहि जर बंधांत टाकिलें तर मग खऱ्या स्त्रीच्या हातीं सांपडल्यावर तो कसचा सुटतो ! १३० अहो, जे स्वतःला पुरुष म्हणवितात आणि शेवटीं स्त्रियांचे पाय धरितात त्यांना मुक्ति कोठची ! स्त्रीसंगानें अधःपातच होणार. १३१.

—तसेंच—

प्राज्ञः आत्मनः मृत्युं स्त्रियं कर्हिचित् न अधिगच्छेत्—विवेकी मुमुक्षूनें स्वतःचा मृत्यूच अशा स्त्रीजवळ कधींहि जाऊं नये. यथा गजः अन्यैः बलाधिकैः गजैः तथा सः हन्येत्—ज्याप्रमाणें एक गज दुसऱ्या बलाढ्य गजांकडून मारिला जातो त्याप्रमाणें स्त्रीसहवास करणारा पुरुष स्त्रीकडून मारला जातो. १४.

हत्तीणींच्या समूहांत हत्ती क्रीडा करीत असतां त्यावर दुसरा प्रबल मत्त हत्ती चालून येऊन त्याच्याशीं लढतो आणि आपल्या बलानें त्याला मारितो. ३२ त्या हत्तीला अशा तऱ्हेनें मारून मग त्या सर्व हत्तिणींना तो यशस्वी हत्ती भोगितो. सारांश काय ! नाशाचें मूळ स्त्री आहे. ३३ अहल्येच्या संबंधामुळेंच इंद्राची गौतमाकडून

स्त्रीसंगतीस्तव जाली ॥ ३४ ॥ देखोनि तिलोत्तमा उत्तम वधू । सुंद उपसुंद सखे बंधू । स्त्रीअभिलाषें चालिला क्रोधू । सुहृदसंबंधू विसरले ॥ ३५ ॥ मग स्त्रीविरहें युद्धाचे ठायीं । दोघे निमाले येरयेरांचे घायीं । शेखीं स्त्रीभोगूही नाहीं । मरणमूळ पाहीं योषिता ॥ ३६ ॥ ऐसीच पूर्वकल्पींचि कथा । अवतारीं श्रीकृष्ण नांदतां । तेणें शिशुपाळ गांजोनि सर्वथा । हिरोनि कांता पैं नेली ॥ ३७ ॥ एवं सुरनरपशूंप्रती । नाशासी मूळ स्त्रीसंगती । तिचेनि संगें गृहासक्ती । कलहप्राप्ती स्त्रीमूळ ॥ ३८ ॥ ग्राम्य स्त्रियांचे संगतीं जाणें । तो बसला मरणा धरणें । मरण आल्याही न करणें । जीवेंप्राणें स्त्रीसंगु ॥ ३९ ॥ वेश्येचे संगतीं जातां । बळाधिक्य करी घाता । निरंतर स्वपत्नी भोगितां । नाहीं बाधकता हें न म्हणें ॥ १४० ॥ अविश्रम स्त्रीसेवितां । कामु पावे उन्मत्तता । उन्मत्त कामें सर्वथा । अधःपाता नेइजे ॥ ४१ ॥ एवं हा ठावोवरी । स्त्रीसंग कठिण भारी । क्वचित्संगू जाल्यावरी । नरकद्वारीं घालील ॥ ४२ ॥ नरकीं घालील हे वार्ता । उद्धाराची कायसी कथा । नरकरूप ग्राम्य योषिता । पाहें सर्वथा निर्धारें ॥ ४३ ॥ स्त्री आणि दुसरा अर्थु । हाचि ये लोकीं घोर अनर्थु । येणें अंतरला निजस्वार्थु । शेखीं करी घातु प्राणाचा ॥ ४४ ॥

न देयं नोपभोग्यं च लुब्धैर्यद्दुःखसंचितम् । भुङ्क्ते तदपि तच्चान्यो मधुहेवार्थविन्मधु ॥ १५ ॥

विटंबना झाली. भस्मासुरहि स्त्रीसंगानेंच नाश पावला. ३४ तिलोत्तमेसारखी सुंदर स्त्री पहातांच सुंद व उपसुंद हे दोघे सख्खे भाऊ आपलें नातें विसरले. ३५ स्त्रीलोभानें त्यांचा क्रोध वाढला आणि स्त्रीविरहानें दोघेहि रणांगणांत एकमेकांवर प्रहार करून प्राणास मुकले, अखेर स्त्रीसुखहि लाभलें नाहीं, एकंदरींत स्त्री हेंच मरणाचें मूळ आहे, हें पक्कें समज. ३६ अशीच एक पूर्वयुगांतील कथा आहे. श्रीकृष्णावतारांत त्यानें शिशुपाळाला गांजून कांता हरण केली. ३७ यावरून देव, मनुष्य, पशु या सर्वांच्या नाशाचें मूळ स्त्रीसंग आहे. तिच्यामुळें घरादारावर आसक्ति असते आणि कलहाचें मूळहि तीच आहे. ३८ ग्राम्य स्त्रियांच्या संगतींत जाणें म्हणजे मरणाच्या दारांत बसण्यासारखेंच आहे. मरण आलें तरी स्त्रीसंग करूं नये. ३९ वेश्येचा सहवास तर अधिकच नाश करितो. तसाच स्वपत्नीचा सतत समागम बाधत नाहीं, असेंहि समजूं नये. १४० कारण निरंतर स्त्रीसेवन करण्यानें कामेच्छा अधिक बळावते आणि कामवासना बळावली म्हणजे ती अधःपतनच करविते. ४१ याकरितां स्त्रीसंग फार कठिण आहे. चुकून घडलेला समागमहि नरकाच्या दारांत नेऊन टाकितो. ४२ स्त्री हें नांवसुद्धां पुरुषाला नरकांत टाकितें. मग तिच्यामुळें उद्धाराची गोष्ट पाहिजे कशाला ! ग्राम्य स्त्रिया तर साक्षात् नरकच आहेत, असें तूं जाण. ४३ द्रव्य आणि स्त्री हे दोन या लोकींचे भयंकर अनर्थ आहेत. यांच्या योगें आपला स्वार्थ जें आत्मज्ञान तें अंतरतें आणि प्राणाचाहि घात होतो. १४४.

——त्याग आणि भोग यांनीं रहित असलेला धनसंचय दुसऱ्याच्या हातीं जातो, याविषयीं मधाचें पोळें हरण करणाऱ्या मनुष्याला मीं गुरु केलें, असें अवधूत सांगतो——

लुब्धैः यत् दुःखसंचितं तत् न देयं न उपभोग्यं च—लोभी लोकांनीं जें मोठ्या कष्टानें संचय केलेलें धन असतें तें त्यांच्यानें कोणाला देववतहि नाहीं व त्याचा उपभोगहि घेववत नाहीं. तदपि अन्यः भुङ्क्ते—तर त्याचाहि दुसराच कोणी एखादा बलवान् मनुष्य उपभोग घेतो. तत् च अन्यः—त्याचाहि तिसराच एखादा भोग घेतो. (तो कसा ?) मधुहा मधु इव—मधाचें हरण करणारा मधमाशांनीं जमविलेल्या मधाचा उपभोग घेतो जसा त्याप्रमाणें (' अहोपण, लोभ्यानें अगदीं गुप्त ठेविलेलें धन दुसऱ्याला कळणारा कसें व जर कळलेंच नाहीं तर तो त्याचें हरण तरी करणार कसें ? ' उत्तर—) अर्थवित्—चिन्हांवरून गुप्त धन व तें हरण करण्याचा उपाय, यांना जाणणारा मनुष्य त्याचें हरण करूं शकतो. [जसा मधाचें हरण करणारा मनुष्य वृक्षाच्या ढोलींत वगैरे असलेलें मधाचें पोळें शोधून काढितो व उपायानें त्याचें हरण करितो, त्याप्रमाणें.] १५.

स्वयें खाये ना धर्मु न करी । घरच्यांसी खाऊं नेदी दरिद्री । मधुमक्षिकेच्या परी । संग्रहो करी कष्टेनी ॥ ४५ ॥ माशा मोहळ बांधिती बळें । माजी सांचले मधाचे गोळे । तें देखोनि जगाचे डोळे । उपायबळें घेवों पाहाती ॥ ४६ ॥ मग झाडींखोडीं अरडींदरडीं । जेथिंच्या तेथ जगु झोडी । भरती मधाचिया कावडी । ते सेविती गोडी श्रीमंत ॥ ४७ ॥ माशा मधु न खाती काकुलती । झाडित्याचे हात माखती । स्वादु श्रीमंत सेविती । ज्यांसी लक्ष्मीपती प्रसन्न ॥ ४८ ॥ तैसेंचि कृपणाचें यक्षधन । नाहीं दान धर्म संरक्षण । त्यातें तस्कर नेती मारून । त्यांसही दंडून राजा ने ॥ ४९ ॥ जे शिणोनि संग्रह करिती । त्यासी नव्हे भोगप्राप्ती । ते द्रव्यें अपरिग्रही सेविती । दैवगती विचित्र ॥१५०॥ प्रयासें गृहस्थ करवी अन्न । तें संन्यासी न शिणतां जाण । करूनि जाय भोजन । अदृष्ट प्रमाण ये अर्थी ॥ ५१ ॥ यालागीं दैवाधीन जो राहे । तो संग्रहाची चाड न वाहे । तें अदृष्टचि साह्य आहे । कृपणता वायें करिताती ॥ ५२ ॥

सुदुःखोपार्जितैर्वित्तैराशासानां गृहाशिषः । मधुहेवाग्रतो भुङ्क्ते यतिर्वै गृहमेधिनाम् ॥ १६ ॥

दुःखें उपार्जूनि वित्त । गृहसामग्री नाना पदार्थ । त्याचे पाक करवी गृहस्थ । निजभोगार्थ आवडीं ॥ ५३ ॥ तेथ समयीं आला अतिथ । संन्यासी ब्रह्मचारी अन्नार्थ । गृहस्थाआधीं तो सेवित । तोंड पहात गृहमेधी ॥ ५४ ॥ जैसें दवडून मोहळमाशियांसी । मधुहर्ता मधु प्राशी । तैसें होय

कृपण मनुष्य स्वतः खात नाहीं, धर्म करीत नाहीं व घरांतल्या माणसांनाहि खाऊं देत नाहीं. मधमाशीसारखा कष्ट करून संग्रह मात्र करून ठेवितो. ४५ मधमाशा मोठ्या श्रमानें मोहोळ बांधितात आणि तें मधानें थबथबलेलें दिसलें म्हणजे जगाचे डोळे त्याच्याकडे लागतात व कोणत्या उपायानें तें हस्तगत करावें, हें पाहूं लागतात. ४६ नंतर झाडे-झुडपें, अरडी-दरडी यांना झोडून लोक जागच्याजागीं मधाच्या कावडी भरतात आणि श्रीमंत त्यांचा आस्वाद घेतात. ४७ मधमाशा बिचाऱ्या मध खात नाहींत, मोहोळ पाडणारांचेहि हात मधानें माखतात आणि ज्यांच्यावर लक्ष्मीपतीची कृपा आहे असे धनिक मात्र त्या मधाची चव घेतात. ४८ त्याचप्रमाणें कृपणानें राखून ठेविलेलें धन असतें. त्याला दान, धर्म व संरक्षण त्यांतील कांहींच नसल्यामुळें अखेर चोर तें लुटून नेतात आणि त्या चोरांनाहि शिक्षा करून राजा तें द्रव्य घेतो. ४९ जो कष्ट करून संग्रह करितो त्याला त्यापासून कांहींच सुख होत नाहीं. आणि जे त्याचा संग्रह करीत नाहींत ते त्याचा उपभोग घेतात. दैवाची लीला अशी विचित्र आहे. १५० गृहस्थ मोठ्या प्रयासानें स्वयंपाक करवितो आणि संन्यासी कांहीं कष्ट न सोशितां जेवून जातो, यावरून अदृष्टच खरें ठरतें.५१ यास्तव जो दैवाधीन असतो तो संग्रहाची इच्छा धरीत नाहीं. त्याला दैवच साह्य करीत असतें. परंतु लोक मात्र व्यर्थ कृपण बनतात. १५२.

—स्वतःच्या उद्यमावांचूनहि भोग संभवतो, याविषयींहि मीं त्याच मनुष्याला गुरु केलें, असें आतां अवधूत सांगतो—

आशासानां गृहमेधिनां सुदुःखोपार्जितैः वित्तैः यतिः मधुहा इव गृहाशिषः अग्रतः वै भुङ्क्ते—सकाम गृहस्थांच्या अतिशय कष्टानें संपादिलेल्या वित्तांनीं यति, मधाच्या पोळ्याचें हरण करणाऱ्या मनुष्याप्रमाणें, गृहस्थाश्रमी पुरुषाच्या आधींच जेवून तृप्त होतो. [यति व ब्रह्मचारी हे दोघे गृहस्थाच्या घरांत शिजलेल्या अन्नाचे स्वामी आहेत. यास्तव त्यांना न देतां जो जेवितो त्या गृहस्थानें चांद्रायण व्रत करावें, अशा आशयाच्या स्मृतिवचनानें गृहस्थाला अन्नदानाचें आवश्यकत्वानें विधान केलें आहे.] १६.

गृहस्थ मोठ्या दगदगीनें द्रव्य मिळवितो आणि घरांत लागणारी प्रपंचाची सामुग्री व अनेक पदार्थ जमवून मोठ्या आवडीनें त्याचा स्वयंपाक करवितो, ५३ पण जेवणाच्या वेळीं एखादा अन्नार्थी संन्यासी किंवा ब्रह्मचारी येऊन तो त्या गृहस्थाच्या आधीं जेवून जातो आणि हा गृहस्थ मात्र तोंड पहात रहातो. ५४ मोहळावरील माशांना घालवून

गृहस्थासी । नेती संन्यासी सिद्धपाकू ॥ ५५ ॥ समयीं पराङ्मुख झालिया यती । सकळ पुण्यें क्षया जाती । यथाकाळीं आलिया अतिथी । स्वधर्मु रक्षिती सर्वथा ॥ ५६ ॥ अर्थसंग्रहाची बाधकता । तुज म्यां सांगितली तत्त्वतां । मृग गुरु केला सर्वथा । तेही कथा परियेसीं ॥ ५७ ॥

ग्राम्यगीतं न शृणुयाद्यतिर्वनचरः क्वचित् । शिक्षेत हरिणाद्बद्धान्मृगयोर्गीतमोहितात् ॥ १७ ॥

ग्राम्यजनवार्ता । कां ग्राम्यस्त्रियांच्या गीता । ऐके जो कां तत्त्वतां । बंधन सर्वथा तो पावे ॥ ५८ ॥ अखंड पाहातां दीपाकडे । घंटानादें झालें वेडें । मृग पाहों विसरला पुढें । फांसीं पडे सर्वथा ॥ ५९ ॥ ग्राम्ययोषितांचें गीत । ऐकतां कोणाचें भुलेना चित्त । मृगाच्या ऐसा मोहित । होय निश्चित निजस्वार्थी ॥ १६० ॥ जो बोलिजे तापसांचा मुकुटी । ज्यासी स्त्रियांची नाहीं भेटगोष्टी । तो ऋष्यशृंग उठाउठीं । स्त्रीगीतासाठीं भुलला ॥ ६१ ॥

नृत्यवादित्रगीतानि जुषन् ग्राम्याणि योषिताम् । आसां क्रीडनको वश्य ऋष्यशृङ्गो मृगीसुतः ॥ १८ ॥

मधुर वीणागुणक्वणित । ग्राम्य स्त्रियांचें गीत नृत्य । देखतां पुरुष वश्य होत । जैसें गळबंधस्थ वानर ॥ ६२ ॥ जो तापसांमाजीं जगजेठी । जो जन्मला मृगीच्या पोटीं । जो नेणे स्त्रियांची भेटीगोठी । न पाहे दृष्टीं योषिता ॥ ६३ ॥ तो ऋष्यशृंग स्त्रीदृष्टीं । वश्य जाहला उठाउठी । धांवे योषितांचे पाठोवाठीं । त्यांचे गोष्टीमाजीं वर्ते ॥ ६४ ॥ गारुड्याचें वानर जैसें । स्त्रियांसंगें नाचे तैसें । प्रमदादृष्टीं जाला पिसें ।

मध लुटणारे मध सेवन करितात. त्या माशांच्यासारखी गृहस्थाची स्थिति होते. संन्यासी, अतिथि शिजलेलें सर्व अन्न सेवन करितात. ५५ भोजनाच्यावेळीं संन्यासी विमुख गेल्यास गृहस्थाच्या सर्व पुण्याचा क्षय होतो. योग्यकाळीं आलेला अतिथि सर्वप्रकारें धर्मरक्षण करितो. ५६ असो, द्रव्यसंग्रहापासून होणारी हानि मीं तुला तत्त्वतः सांगितली. आतां मृगाला गुरु करून मी काय शिकलों, ती कथा ऐक. १५७.

—हरिणापासून काय शिकलों, हें आतां अवधूत सांगतो—

वनचरः यतिः ग्राम्यगीतं न शृणुयात्–वनामध्यें रहाणाऱ्या यतीनें ग्राम्यगीत केव्हांहि ऐकूं नये. हें योग्यानें, मृगयोः गीतमोहितात् बद्धात् हरिणात् शिक्षेत–पारध्याच्या गायनावर मोहित होऊन पाशांत बद्ध झालेल्या हरिणापासून शिकावें. १७.

ग्राम्य व्यसनी लोकांच्या गोष्टी किंवा गाणें जो ऐकतो तो खरोखरच बंधांत पडतो. ५८ एका मोठ्या भव्य मंदिरामध्यें दिवा तेवत होता व घंटानादहि होत होता. एक हरिण त्या दीपाकडे पहात पुढें चालला. घंटेच्या नादानें तो देहभान विसरला. त्यामुळें त्याला पुढला रस्ता दिसेनासा झाला आणि अचुक फांसांत सांपडला. ५९ ग्राम्य स्त्रियांचें गाणें ऐकून कोणाचें मन भाळत नाहीं! मृगाप्रमाणेंच तो स्वार्थानें मोहांत पडतो. १६० तपस्वीजनांचा मुकुटमणि, ज्याला स्त्रियांची भेट किंवा भाषण कधीं ठाऊक नव्हतें असा ऋष्यशृंग एकदम स्त्रीगीताला भाळला. १६१.

—'हरिण' या शब्दावरून हरिणीचा पुत्र ऋष्यशृंगहि गुरु जाणावा असें अवधूत सांगतो—

मृगीसुतः ऋष्यशृङ्गः योषितां ग्राम्याणि नृत्यवादित्रगीतानि जुषन्–हरिणीचा पुत्र ऋष्यशृंग स्त्रियांचें ग्राम्य नृत्य, वाद्य व गायन ऐकूनच, आसांवश्यः क्रीडनकः बभूव–त्यांच्या हातांतील खेळणें झाला. १८.

वीणेच्या तारेंतून निघालेला मधुर ध्वनि व नर्तकीचें नृत्य, गायन, हें ऐकून पुरुष गळ्यांत दोरी बांधिलेल्या माकडाप्रमाणें वश होतात. ६२ तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ, हरिणीपासून जन्मलेला, ज्याला स्त्रियांच्या भेटी-गांठी कधीं माहीत नाहींत, स्त्रिया ज्याच्या कधीं दृष्टीसहि पडलेल्या नाहींत. ६३ असा ऋष्यशृंग स्त्री दृष्टीस पडतांच तत्काल तिला वश झाला, तिच्यामागें धांवूं लागला आणि तिच्याशीं गोष्टींतच रमला–गुंग झाला. ६४ गारुड्याच्या माकडासारखा तो स्त्रियां-

विवेकू मानसें विसरला ॥ ६५ ॥ विसरला तपाचा खटाटोपु । विसरला विभांडक बापु । विसरला ब्रह्मचर्यकृत संकल्पु । स्त्रियानुरूपु नाचतू ॥ ६६ ॥ स्त्रीबाधे एवढा बाधू । संसारीं आणिक नाहीं गा सुबद्धु । नको नको स्त्रियांचा विनोदू । दुःखसंबंधू सर्वांसी ॥ ६७ ॥ वारिलें नायकावें ग्राम्य गीता ॥ हें सत्य सत्य गा सर्वथा । तेथ हरिकीर्तन कथा । जाल्या परमार्थता ऐकावें ॥ ६८ ॥ रामनामें विवर्जित । ग्रामणीं बोलिजे तें ग्राम्य गीत । तें नायकावें निश्चित । कवतुकें तेथ न वचावें ॥ ६९ ॥ मीन गुरु करणें । तेंही अवधारा लक्षणें । रसनेचेनि लोलुप्यपणें । जीवेंप्राणें जातसे ॥ १७० ॥

जिह्वयातिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः । मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा ॥ १९ ॥

अर्थसंग्रहें जीवघातू । स्त्रिया आसक्तीं अधःपातू । रसनालोलुप्यें पावे मृत्यू । त्रिविध घातू जीवासी ॥ ७१ ॥ ज्यासी रसनलोलुप्यता गाढी । त्यासी अनर्थुचि जोडे जोडी । दुःखाच्या भोगवी कोडी । रसनागोडी बाधक ॥ ७२ ॥ रसना आमिषाची गोडी । लोलुप्यें मीनु गिळी उंडी । सवेंचि गळ टाळु फोडी । मग चरफडी अडकलिया ॥ ७३ ॥ पाहतां रस उत्तम दिसत । भीतरीं रोगांचे गळ गुप्त । रस आसक्ती जे सेवित । ते चडफडित भवरोगीं ॥ ७४ ॥ गळीं अडकला जो मासा । तो जित ना मरे चरफडी तैसा । तेवीं रोगू लागल्या माणसा । दुःखदुर्दशा भोगित ॥ ७५ ॥ रसनालोलुप्यप्रमादी । त्यासी कैची सुबुद्धी । जन्ममरणें निरवधी । भोगी त्रिशुद्धी रसदोषें ॥ ७६ ॥ रस सेविलियासाठीं भोगवी जन्मांचिया कोटी । हें न घडे म्हणसी पोटीं । राया ते गोठी परियेसीं ॥ ७७ ॥ इंद्रियांची

बरोबर नाचूं लागला. स्त्रीदर्शनानें वेडा झाला आणि विवेक विसरला, ६५ तपाची खटपट विसरला, आपला पिता जो विभांडक ऋषि त्याचाहि त्याला विसर पडला. ब्रह्मचर्याच्या संकल्पाचें त्याला विस्मरण झालें आणि स्त्रियांसारखाच तो नाचूं लागला. ६६ संसारांत स्त्रियांच्यासारखा दुसरा कोणताहि प्रचंड अडथळा नाहीं. नको, नको स्त्रियांशीं विनोद तर मुळींच उपयोगी नाहीं. तो सर्वांनाच दुःख देणारा आहे. ६७ यासाठीं ग्राम्य गीतें केव्हांहि ऐकूं नयेत, हें सर्वथा सत्य आहे. तेथें जर हरिकीर्तन असेल तर तें मात्र परमार्थतः ऐकावें. ६८ ग्राम्य पुरुषांनीं गाइलेलें जें रामनामरहित गीत त्याला 'ग्राम्यगीत' म्हणतात. तें गीत कानांवरहि पडूं देऊं नये. कौतुकानें तेथें फिरकूंहि नये. ६९ आतां मीं माशाला गुरु केला, त्याचीं लक्षणें ऐक. तो केवल रसनालोलुप होऊन जीवाला आणि प्राणाला मुकतो. १७०.

—रसासक्ति नाशाचें कारण आहे हें मी मत्स्यापासून शिकलों, असें अवधूत सांगतो—

यथा बडिशैः मीनः—ज्याप्रमाणें आमिष लावलेल्या गळांनीं मासा प्राणाला मुकतो, त्याप्रमाणें, **अतिप्रमाथिन्या जिह्वया रसविमोहितः असद्बुद्धिः जनः मृत्युं ऋच्छति**—अतिशय क्षोभ उत्पन्न करणाऱ्या जिव्हेकडून रसाविषयीं अत्यंत मोहित केला गेलेला हा मिथ्याबुद्धि जीव मृत्यूला प्राप्त होतो. १९.

द्रव्यसंचयानें जीवाचा घात होतो, स्त्रीसंगानें अधःपात होतो, जिव्हालोलुपतेनें मृत्यु ओढवतो, असे जीवाला तीन प्रकारचे घात आहेत. ७१ ज्याच्या जिभेला रसाची चटक लागली आहे तो अनर्थांत पडतो व कोट्यवधि दुःखें भोगितो, अशी रसनेची गोडी बाधक आहे. ७२ जिभेला आमिषाची गोडी लागल्यामुळें मासा गळाला लावलेला मांसाचा गोळा गिळतो, लगेच गळ त्याची टाळू फोडितो आणि त्यांत अडकल्यावर तो तडफडूं लागतो. ७३ तसेंच वरून पाहूं गेल्यास रस मोठे उत्तम दिसतात, पण त्यांच्यामध्यें रोगरूपी गुप्त गळ असतात आणि जे आसक्तीनें रसाचें सेवन करितात ते भवरोगानें तडफडतात. ७४ घशांत गळ अडकलेला मासा धड जिवंत ना धड मेलेला अशा स्थितींत जसा तडफडतो, तसाच रोगी मनुष्य क्लेश भोगीत असतो. ७५ ज्याला रसनालोलुप्याचा दोष जडला आहे, त्याला सुबुद्धि कोठून होणार ! जिव्हेच्या अधीन होऊन तो अनंत जन्म-मरणपरंपरा भोगीत असतो. ७६ अहोपण, केवळ रसासक्तीनें कोट्यवधि जन्म कांहीं घ्यावे लागत नसतील, असें जर म्हणशील, तर हे राजा ! ऐक. ७७ इंद्रियांचें जीवित केवळ रसनेच्या स्वाधीन आहे. रसनेच्याद्वारां रससेवन केल्यास इंद्रियाला बळ येतें ७८

सजीवता । ते रसनेआधीन सर्वथा । रसनाद्वारें रस घेतां । उन्मत्तता इंद्रियां ॥ ७८ ॥ मातली जे इंद्रियसत्ता । ते नेऊनि घाली अधःपाता । रसना न जिणतां सर्वथा । भवव्यथा चुकेना ॥ ७९ ॥ आहारेंवीण देह न चले । सेविल्याइंद्रियवर्गू खवळे । रसनाजयाचें मूळ कळे । तैं दुःखें सकळें मावळलीं ॥ १८० ॥

इंद्रियाणि जयन्त्याशु निराहारा मनीषिणः । वर्जयित्वा तु रसनं तन्निरन्नस्य वर्धते ॥ २० ॥
तावज्जितेन्द्रियो न स्याद्विजितान्येन्द्रियः पुमान् । न जयेद्रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥ २१ ॥

आहार वर्जूनि साधक । इतर इंद्रियें जिंतिलीं देख । तंव तंव रसना वाढे अधिक । ते अजिंक न जिंकवे ॥ ८१ ॥ इंद्रियांसी आहाराचें बळ । तीं निराहारें जालीं विकळ । तंव तंव रसना वाढे प्रबळ । रसनेचें बळ निरन्नें ॥ ८२ ॥

निरन्नें इंद्रियें जिंतिलीं । तीं जिंतिलीं हे मिथ्या बोली । अन्न घेतांचि सरसावलीं । सावध जालीं निजकर्मीं ॥ ८३ ॥ जंव रसना नाहीं जिंकिली । तंव जितेंद्रिय मिथ्या बोली । जैं साचार रसना जिंकिली । तैं वाट मोडिली विषयांची ॥ ८४ ॥ विषयाआंतील गोडपण । रसनेआंतील जाणपण । दोहींसी ऐक्य केल्या जाण । रसना संपूर्ण जिंतिली ॥ ८५ ॥ सर्वां गोडियांचें गोड आहे । ते गोडीस जो लागला आहे । त्यासीचि रसना वश्य होये । रस अपायें न बाधिती ॥ ८६ ॥ रसनाजितांचें वाधावणें । तेणें ब्रह्मसायुज्यीं पडे ठाणें । सोहळा परमानंदें भोगणें । रसना जेणें जिंतिली ॥ ८७ ॥

आणि इंद्रियें प्रमत्त झालीं म्हणजे तीं अधःपात करितात. रसनेला जिंकल्यावांचून भवव्याधि कधीं चुकत नाहीं. ७९ आहारावांचून शरीर चालत नाहीं. तो करावा तर इंद्रियें प्रबल होतात. तेव्हां जिव्हेला कसें जिंकावें हें समजलें कीं सर्व दुःखांचा लय होतो. १८०.

—अवधूत जिव्हेच्या दुर्जयत्वाचेंच उपपादन पुढील दोन श्लोकांनीं करितो—

निराहाराः मनीषिणः–आहार न करणारे विद्वान्, **रसनं तु वर्जयित्वा**–एका रसनेंद्रियाला सोडून, **इंद्रियाणि आशु जयन्ति**–इतर इंद्रियांना सत्वर जिंकितात. **निरन्नस्य तत् वर्धते**–पण अन्नग्रहण न करणाऱ्या मनुष्याचें रसनेन्द्रिय वाढतें (म्ह० त्याची अन्नाविषयींची आसक्ति उद्दीपित होते, रसासक्ति वाढल्यामुळें जर त्यानें अन्न भक्षण केलें तर सर्वेंद्रियांचा क्षोभ होतो, म्हणून रसासक्ति टाकून औषधाप्रमाणें अन्नभक्षण करावें. कारण) **पुमान् यावत् रसनं न जयेत्**–पुरुषानें जोंवर रसनेंद्रियाला जिंकलेलें नसतें, **तावत् विजितान्येन्द्रियः जितेंद्रियः न स्यात्**–तोंवर त्यानें इतर इंद्रियांना जरी स्वाधीन ठेवलेलें असलें तरी तो जितेंद्रिय होऊं शकत नाहीं. **रसे जिते सर्वं जितम्**–रस जिंकला असतां सर्व जिंकिल्यासारखें होतें. ' प्राणवृत्तीनेंच संतुष्ट व्हावें ' असें जरी वर सांगितलेलें आहे, तरी रसनेंद्रिय अति दुर्जय आहे, हें सुचविण्यासाठीं पुनरपि येथें रसनेंद्रियाचें नियमन करावयास सांगितलें आहे. २०–२१.

साधक आहार सोडून इतर इंद्रियांना जों जों जिंकूं पहातो तों तों रसना अधिकच बळावते. ती इतकी अजिंक्य आहे कीं, तिला जिंकतांच येत नाहीं. ८१ इतर इंद्रियांना आहाराचें बळ आहे. पण निराहारानें तीं जशीं जशीं दुर्बल होतात तशी तशी रसना जास्त जास्त प्रबळ होते. अन्न न मिळाल्यामुळें रसनेचें बळ वाढतें. १८२.

निराहारानें इंद्रियें जिंकिलीं, ही समजूत खोटी आहे. कारण अन्नग्रहण करितांच त्यांना शक्ति येते व तीं पुनः आपापल्या कार्यांत प्रवृत्त होतात. ८३ जोंपर्यंत रसनेला जिंकिलें नाहीं तोंपर्यंत जितेंद्रिय म्हणवून घेणें व्यर्थ आहे. रसना जिंकिली कीं खरोखर विषयांचा मार्गच खुंटतो. ८४ विषयांची गोडी आणि रसनेची जाणीव या दोहोंचें एकीकरण झालें कीं रसना जिंकिली, असें जाण. ८५ सर्व माधुर्यांचेंहि जें माधुर्य त्याची गोडी ज्याला कळली त्याला रसना ताब्यांत ठेवितां येते. (सु. गी २-५९ पृ. ४८ पहा). ८६ रसनेला जिंकल्याची द्वाहि फिरविली म्हणजे सायुज्य ब्रह्माची प्राप्ति होते. ज्यानें रसना जिंकिली असेल त्यानेंच परमानंदाचा सोहळा भोगावा. १८७.

पिङ्गला नाम वेश्यासीद्विदेहनगरे पुरा । तस्या मे शिक्षितं किंचिन्निबोध नृपनन्दन ॥ २२ ॥

अवधूत म्हणे नृपनंदना । वेश्या गुरु म्यां केली जाणा । तिच्या शिकलों ज्या लक्षणा । विचक्षणा अवधारीं ॥ ८८ ॥ पूर्वी विदेहाचे नगरीं । पिंगलानामें वेश्या वास करी । तीशीं आसनिरासेंवरी । वैराग्य भारी उपजलें ॥ ८९ ॥

सा स्वैरिण्येकदा कान्तं सङ्केत उपनेष्यती । अभूत्काले बहिर्द्वारि बिभ्रती रूपमुत्तमम् ॥ २३ ॥

ते स्वैरिणी स्वेच्छाचारी । सायंकाळीं उभी द्वारीं । नाना अळंकार अंबरीं । श्रृंगारकुसरी शोभत ॥ १९० ॥ आधींच रूप उत्तम । वरी श्रृंगारिली मनोरम । करावया ग्राम्यधर्म । पुरुष उत्तम पहातसे ॥ ९१ ॥

मार्ग आगच्छतो वीक्ष्य पुरुषान्पुरुषर्षभ । तान् शुल्कदान्वित्तवतः कान्तान्मेनेऽर्थकामुका ॥ २४ ॥

सगुण सुरूप धनवंत । कामकौशल्यें पुरवी आर्त । अर्थ देऊनि करी समर्थ । ऐसा कांत पहातसे ॥ ९२ ॥ ऐक गा पुरुषश्रेष्ठा । पुरुष येतां देखे वाटा । त्यासी खुणावी नेत्रवेंकटा । कामचेष्टा दावूनी ॥ ९३ ॥

आगतेष्वपयातेषु सा सङ्केतोपजीविनी । अप्यन्यो वित्तवान्कोऽपि मामुपैष्यति भूरिदः ॥ २५ ॥
एवं दुराशया ध्वस्तनिद्रा द्वार्यवलम्बती । निर्गच्छन्ती प्रविशती निशीथं समपद्यत ॥ २६ ॥

——पिंगलेपासून आपण वैराग्य शिकलों, हें सांगण्यासाठीं अवधूत तिचें आख्यान सांगतो——

नृपनंदन–हे राजपुत्रा, पुरा विदेहनगरे पिङ्गलानाम वेश्या आसीत्–पूर्वी विदेह नगरांत पिंगला नांवाची एक वेश्या होती तस्याः मे किंचिद् शिक्षितं निबोध–तिच्यापासून मी जें कांहीं शिकलों तें तूं ऐक. २२.

अवधूत म्हणतो–हे नृपनंदना, चतुर राजा ! मीं वेश्येला गुरू केलें व तिच्यापासून काय शिकलों, तें ऐक. ८८ पूर्वी विदेहराजाच्या नगरांत पिंगला नांवाची एक वेश्या रहात होती. तिच्या आशेची निराशा झाल्यामुळें तिला तीव्र विरक्ति आली. १८९.

एकदा सा स्वैरिणी–एकदा ती स्वैरिणी वेश्या, कान्तं संकेते उपनेष्यती–एखाद्या कामी पुरुषाला रतिस्थानीं बोलावून नेण्याची इच्छा करणारी होत्साती, उत्तमं रूपं बिभ्रती–उत्तम वेष धारण करून, बहिर्द्वारि काले अभूत्–पुढल्या दारीं पुष्कळ वेळ उभी होती. २३.

ती स्वच्छंद व स्वैर वागणारी वेश्या, नानाप्रकारच्या वस्त्रालंकारांनीं युक्त होऊन, संध्याकाळीं दारांत उभी राहून शृंगारचेष्टांनीं शोभत असे. १९० आधींच देखणी, त्यांत शृंगारांनीं सजलेली, अशी ती आपल्या विलासतृप्तीसाठीं उत्तम पुरुषाची वाट पहात होती. १९१.

पुरुषर्षभ-हे पुरुषश्रेष्ठा ! मार्गे आगच्छतः पुरुषान् वीक्ष्य–रस्त्यांतून येणाऱ्या पुरुषांना पाहून, अर्थकामुका तान् वित्तवतः शुल्कदान् कान्तान् मेने–धनाची इच्छा करणारी ती त्यांना सधन, त्यामुळेंच रतीसाठीं धन देणारे व विलासास योग्य मानिती झाली. २४.

गुणी, देखणा, धनिक, कामविलासानें इच्छा पुरविणारा व द्रव्य देऊन तिला श्रीमंत करणारा असा रमण ती शोधित असे. ९२ हे श्रेष्ठ राजा ! ऐक. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूंना ती नेत्रकटाक्षांनीं खुणावीत असे. १९३.

सङ्केतोपजीविनी सा–रतिस्थानावर उपजीविका करणारी ती, आगतेषु अपयातेषु–रस्त्यानें आलेले लोक तसेच पुढें निघून गेले असतां, अन्यः अपि कः अपि भूरिदः वित्तवान् मां उपैष्यति–दुसराहि कोणी तरी एखादा पुष्कळ वित्त देणारा धनिक मजकडे येईल, एवं दुराशया–अशा दुष्ट आशेनें, ध्वस्तनिद्रा–जिच्या निद्रेचा भंग झाला आहे, द्वारि अवलम्बती प्रविशती निर्गच्छन्ती निशीथं समपद्यत–अशी ती कांहीं वेळ दारांत उभी रहात असे, पुनः घरांत जात असे, व पुनः बाहेर येत असे. यांतच तिची मध्यरात्र उलटून गेली. २५–२६.

येत्या पुरुषास हाणी खडा । एकासी म्हणे घ्या जी विडा । डोळा घाली ज्यात्याकडा । एकापुढां भंवरी दे ॥ ९४ ॥ ठेऊनि संकेतीं जीवित । ऐसे नाना संकेत दावित । पुरुष तिकडे न पाहात । येत जात कार्यार्थी ॥ ९५ ॥ गेल्या पुरुषातें निंदित । द्रव्यहीन हे अशक्त । रूपें विरूप अत्यंत । उपेक्षित धिक्कारें ॥ ९६ ॥ आतां येईल वित्तवंत । अर्थदानीं अतिसमर्थ । माझा धरोनियां हात । कामआर्त पुरवील ॥ ९७ ॥ ऐसें दुराशा भरलें चित्त । निद्रा न लगे उद्वेगित । द्वार धरोनि तिष्ठत । काम वांछित पुरुषासी ॥ ९८ ॥ रिघों जाय घराभीतरीं । सांचल ऐकोनि रिघे बाहेरी । रिघतां निघतां येरझारीं । मध्यरात्रीं पैं झाली ॥ ९९ ॥ सरली पुरुषाची वेळ । रात्र झाली जी प्रबळ । निद्रा व्यापिले लोक सकळ । पिंगला विव्हल ते काळीं ॥ २०० ॥

तस्या वित्ताशया शुष्यद्वक्त्राया दीनचेतसः । निर्वेदः परमो जज्ञे चिन्ताहेतुः सुखावहः ॥ २७ ॥

तुटला आशेचा जिव्हाळा । सुकले वोंठ वाळला गळा । कळा उतरली मुखकमळा । खेदु आगळा चिंतेचा ॥ १ ॥ वित्त न येचि हाता । तेणें ते झाली दीनचित्ता । वैराग्यें परम वाटली चिंता । सुखस्वार्था ते हेतु ॥ २ ॥

तस्या निर्विण्णचित्ताया गीतं शृणु यथा मम । निर्वेद आशापाशानां पुरुषस्य यथा ह्यसिः ।
नह्यङ्गाजातनिर्वेदो देहबन्धं जिहासति ॥ २८ ॥

ती रस्त्यानें येणाऱ्या कोणाला खडा मारीत असे, दुसऱ्याला डोळ्यानें खुणावून 'विडा घ्या' म्हणत असे. कोणापुढें मुरका मारीत असे. ९४ याप्रमाणें संकेतांत मन ठेवून ती लोकांना अनेक हावभाव दाखवीत असे. परंतु येणारेजाणारे व्यवहारी लोक तिकडे पहातहि नसत. ९५ तिच्याकडे न पहातां निघून गेलेल्या पुरुषांची ' हे द्रव्यहीन व दुर्बल आहेत ' अशी ती निंदा करीत असे. अत्यंत कुरूप म्हणून तिरस्कारानें त्यांना धिक्कारीत असे. ९६ मला श्रीमान् करून सोडणारा आतां एखादा धनाढ्य येईल व तो माझा हात धरून माझी इच्छा पुरवील, १९७ अशा दुर्वासनेनें तिचें मन भरलें. तिला उद्वेगामुळें रात्रीं झोंपहि येईना. पुरुषसमागमाच्या इच्छेनें ती दारांत वाट पहात उभी होती. ९८ घरांत जावें तों कांहीं चाहुल लागतांच बाहेर यावें, अशा येरझाऱ्यांत मध्यरात्रहि उलटून गेली. ९९ पुरुषाची येण्याची वेळ टळली. मध्यरात्र झाल्यामुळें सर्व लोक गाढ झोंपेंत मग्न झाले. त्यामुळें पिंगला विव्हळ होऊन बसली. २००

वित्ताशया शुष्यद्वक्त्राया दीनचेतसः तस्याः—याप्रमाणें धनाच्या आशेनें जिचें तोंड सुकून गेलें आहे व चित्त दीन झालें आहे अशा तिच्या मनांत, **चिंताहेतुः सुखावहः परमः निर्वेदः जज्ञे**—धनाची चिंता हेंच ज्याचें निमित्त आहे असें सुखावह तीव्र वैराग्य उत्पन्न झालें. २७.

आशेचा ओलावा जसा संपला, तसे तिचे ओंठ सुकले. घशाला कोरड पडली. मुखकमल म्लान झालें. चिंतेमुळें खेद वाढला. १ हातीं द्रव्य येत नाहीं, म्हणून ती मनांत अगदीं खिन्न झाली. चिंतेमुळें तिच्या मनांत विरक्ति उत्पन्न झाली व तीच तिच्या आत्मसुखप्राप्तीला कारण झाली. २०२.

निर्विण्णचित्तायाः तस्याः गीतं मम यथा शृणु—जिच्या मनाला वैताग आला आहे अशा त्या पिंगलेचें हें गीत तूं माझ्या तोंडून जसेंच्या तसेंच ऐक. [त्या वैतागलेल्या वेश्येचें गीत ऐकून मला काय करावयाचें आहे असें जर म्हणशील तर–] हि **निर्वेदः पुरुषस्य आशापाशानां असिः**—कारण निर्वेद पुरुषाच्या आशारूपी पाशांचा तलवारीप्रमाणें छेद करणारा आहे. [तलवार जशी शरीरादिकांचा छेद करिते त्याप्रमाणें वैराग्य पुरुषाच्या आशाबंधांना तोडितें.] हि **अङ्ग**—कारण हे राजा ! **अजातनिर्वेदः देहबंधं न जिहासति**— ज्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न झालेलें नाहीं तो देहबंध सोडण्याची इच्छा करीत नाही. २८.

कैसें वैराग्य उपजलें तिसी । जे चिंतीत होती विषयासी । त्या विटली विषयसुखासी । छेदक आशेसी वैराग्य ॥ ३ ॥ तेणें वैराग्यें विवेकयुक्त । पिंगलेनें गाइलें गीत । तें आइक राया समस्त । चित्तीं सुचित्त होऊनी ॥ ४ ॥ ऐक राया विवेकनिधी । वैराग्य नाहीं ज्याचे बुद्धी । त्यासी जन्ममरणाची आधिव्याधी । प्रतिपदीं बाधकु ॥ ५ ॥ अनुतापु नाहीं ज्यासी । विवेक नुपजे मानसीं । तो संसाराची आंदणी दासी । आशापाशीं बांधिजे ॥ ६ ॥ त्यासी मोहममतेची गाढी । घालिजे देहबुद्धीची बेडी । अहोरात्र विषय भरडी । अर्ध घडी न राहे ॥ ७ ॥ जराजर्जरित बांकळे- । माजीं पडले अखंड लोळे । फुटले विवेकाचे डोळे । मार्गु न कळे विध्युक्त ॥ ८ ॥ त्यासी अव्हासव्हा जातां । अंधकूपीं पडे दुश्चिता । तेथुनि निघावया मागुता । उपावो सर्वथा नेणती ॥ ९ ॥ तेथ काया मनें वाचें । निघणें नाहीं जी साचें । तंव फणकाविला लोभाविंचें । चढणें त्याचें अनिवार ॥ २१० ॥ तेथ निंदेचिया तिडका । आंत बाहेर निघती देखा । वित्तहानीचा थोर भडका । जळजळ देखा द्वेषाची ॥ ११ ॥ अभिमानाचे आळेपिळे । मोहउमासे येती बळें । तरी विषयदळणें आगळें । दुःखें लोळे गेहसेजे ॥ १२ ॥ ऐशीं अवैराग्यें बापुडीं । पडलीं देहाचे बांदवडीं । भोगितां दुःखकोडीं । सबुड बुडी बुडालीं ॥ १३ ॥ पहा पां नीच सर्व वर्णांसी । निंद्य कर्में निंदिती कैसी । वैराग्य उपजलें वेश्येसी । देहबंधासी छेदिलें ॥ १४ ॥ देहबंध छेदी त्या उक्ती । वेश्या बोलिली नाना युक्ती । झाली पिंगलेसी विरक्ती । चक्रवर्ती परीस पां ॥ १५ ॥

पिं०–अहो मे मोहविततिं पश्यताविजितात्मनः । या कान्तादसतः कामं कामये येन बालिशा ॥ २९ ॥

तिच्यांत विरक्ति कशी उत्पन्न झाली, असें जर म्हणशील तर ऐक. ती ज्या विषयसुखाचें चिंतन करीत होती त्या विषयसुखाचाच तिला वीट आला. वैराग्य आशेला छेदून टाकितें. ३ त्या विरक्तीमुळें तिच्या मनांत विवेक उत्पन्न झाला आणि पिंगलेनें जें गीत गाइलें तें, हे विवेकसागरा राजा ! सावधान चित्तानें ऐक. ४ ज्याच्या मनाला विरक्ति नाहीं, त्याला जन्म-मरणांची आधि-व्याधींची पीडा पदोपदीं होते. ५ ज्याला पश्चात्ताप झालेला नाहीं त्याच्या मनांत विवेक उत्पन्न होत नाहीं. तो आंदण दिलेल्या दासीप्रमाणें संसाराशीं बद्ध असतो आणि आशारूपी पाशांत अडकतो. ६ त्याला मोह-ममतेनें दृढ झालेली अहंकाराची बेडी घातलेली असते. तो रात्रंदिवस विषय भरडीत असतो. त्याला क्षणभरहि विसावा नसतो. ७ जरेनें जर्जर झालेल्या देहरूपी गोधडीवर पडून त्यांतच तो लोळत असतो. त्याची विवेकदृष्टि गेलेली असते. त्यामुळें त्याला शास्त्रोक्तमार्ग कळत नाहीं. ८ तो सैरावैरां भटकूं लागतो आणि अंधकुपांत पडतो. तेथून वर निघावयास त्याला मार्गच सांपडत नाहीं. ९ त्यांतून त्याला काया-वाचा-मनानें बाहेर पडतांच येत नाहीं. त्यांत आणखीं त्याला लोभरूपी विंचू दंश करितो. त्याचा वेग इतका अनिवार चढतो कीं, २१० आंतूनबाहेरून निंदारूपी तिडिक उठते. त्याचा द्रव्यहानीरूप भडका होतो आणि मग द्वेषरूपी जळजळ होऊं लागते. ११ तो अभिमानाचे आळेपिळे देऊं लागतो आणि त्याला मोहरूपी उमासे जोरानें येऊं लागतात. तरीहि तो विषयांचें पीठ दळीत घरांतल्या शय्येवर दुःखानें लोळत पडलेला असतो. १२ याप्रमाणें बिचारीं अविरक्त माणसें देहाच्या बंदिवासांत सांपडून कोट्यवधि दुःखें भोगून अखेर समूळ बुडतात. १३ निंद्यकर्में सगळ्या वर्णांना कशीं नित्य छळीत असतात, पहा ! वेश्येच्या मनांत विरक्ति उत्पन्न झाली व त्यामुळें तिचें देहबंधन तुटलें. १४ ती वेश्या देहबंधनाचा छेद करणारेंच भाषण करूं लागली. हे सार्वभौमराजा ! पिंगलेच्या अंगीं वैराग्य कसें आलें, तें ऐक. २१५.

पिङ्गला उवाच–पिंगला म्हणाली, अहो अविजितात्मनः मे मोहविततिं पश्यत–अहो, जिनें आपल्या मनाला जिंकलेलें नाहीं अशा माझ्या मोहाचा हा परिणाम पहा ! या बालिशा अहं–जी मी मूर्ख–विवेकशून्य त्या माझा हा केवढा मोह ! येन असतः कान्तात् कामं कामये–कारण कीं, या तुच्छ नरापासून मी कामाची इच्छा करितें. २९.

मिथ्या मोहाचा विस्तार । म्यां वाढविला साचार । माझ्या मूर्खपणाचा पार । पाहतां विचार पांगुळे ।। १६ ।। नाहीं अंतःकरणासी नेम । अपार वाढविला भ्रम । असंतपुरुषांचा काम । मनोरम मानितां ।। १७ ।। जरी स्त्रीसी पुरुष पाहिजे । तरी जवळील पुरुष न लाहिजे । हेंचि मूर्खपण माझें । सदा भुंजे असंतां ।। १८ ।।

सन्तं समीपे रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यमिमं विहाय ।
अकामदं दुःखभयादिशोकमोहप्रदं तुच्छमहं भजेऽज्ञा ।। ३० ।।

संतपुरुषाची प्राप्ती । जवळी असतां नेणें आसक्ती । ज्यासीं केलिया रती । कामनिवृत्ति तत्काळ ।। १९ ।। काम निवर्तवूनि देख । अनिवार पुरवी नित्य सुख । वित्तदाता तोचि एक । अलोलिक पैं देणें ।।२२०।। सकळ ऐश्वर्य निजपदेंसीं । संतोषोनि दे रतीसी । रमवूं जाणे नरनारींसी । रमणू सर्वांसी तो एकू ।। २१ ।। सांडोनि ऐशिया कांतासी । माझी मूढता पहा कैसी । नित्य अकामदा पुरुषासी । कामप्राप्तीसी भाजिन्नलें ।। २२ ।। आपुला पूर्ण न करवे काम । ते मज केवीं करिती निष्काम । त्यांचेनि संगें मोहभ्रम । दुःख परम पावले ।। २३ ।। त्यांचेनि सुख नेदवेच मातें । परी झाले दुःखाचेचि दाते । भयशोकआधिव्याधीं तें । त्यांचेनि सांगातें पावलें ।। २४ ।।

अहो मयाऽऽत्मा परितापितो वृथा साङ्केत्यवृत्त्याऽतिविगर्ह्यवार्तया ।
स्त्रैणान्नरादर्थतृषोऽनुशोच्यात् क्रीतेन वित्तं रतिमात्मनेच्छती ।। ३१ ।।

मी खरोखर मायेचा बाजार भरविलेला होता. माझ्या मूर्खपणाचा विचार करूं लागले, कीं मति कुंठित होते. १६ माझ्या मनावर कांहीं दाब नव्हता. निंद्य पुरुषाशीं विलास करण्यांत मी सुख समजत होतें. हा माझ्या भ्रमाचा अतिरेकच झाला. १७ जर स्त्रीला पुरुषाची अपेक्षा असली तर तिनें आपल्या जवळच्या पुरुषाला--परमात्म्याला वरावें. मीं सर्वदा दुर्व्यसनी पुरुषांशीं संबंध ठेविला, हाच माझा मूर्खपणा झाला. २१८.

—या पुढील चार श्लोकांनीं ती आपल्या मूर्खपणाचें वर्णन करिते—

समीपे सन्तं रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यं इमं विहाय–अंतर्यामित्वामुळें समीप असलेल्या, रममाण करणाऱ्या, रति देणाऱ्या, वित्त देणाऱ्या व नित्य अशा या साक्षात् ईश्वराला सोडून, अहं अज्ञा अकामदं दुःखभयादिशोकमोहप्रदं **तुच्छं भजे**–मी मूढ इच्छा पूर्ण न करणाऱ्या दुःख, भयादि, शोक व मोह देणाऱ्या तुच्छ मनुष्याला भजतें. ३०.

ज्याच्याशीं रत झालें असतां तत्काल कामनिवृत्ति होते त्या परमेश्वराची प्राप्ति पूर्वींच झालेली असूनहि आसक्तीमुळें मला ती कळली नाहीं. १९ कामनिवृत्ति करून जो अनिवार सुख देतो, तोच खरा धनिक होय. त्याचें देणें अकल्पित असतें. २२० जो संतुष्ट होऊन आत्मप्राप्तीसह सर्व ऐश्वर्य देतो, स्त्रीपुरुषांना कसें रमवावें हें जाणतो, तोच सर्वांचा खरा रमण आहे. २१ मी किती मूर्ख पहा ! अशा कांताला सोडून तृप्त न करणाऱ्या पुरुषाच्या नादीं लागलें. २२ ज्याला स्वतःचाच काम तृप्त करवत नाहीं तो मला कसला निष्काम करणार ! अशा लोकांच्या आसक्तीनें मी मोहभ्रमांत पडलें आणि अत्यंत दुःख मात्र भोगिलें. २३ त्यांनीं मला सुख तर दिलें नाहींच, उलट दुःख मात्र दिलें. त्यांच्या संगतींत मला भय, शोक, आधिव्याधि यांची चांगली प्राप्ति झाली. २२४.

अहो अतिविगर्ह्यवार्तया साङ्केत्यवृत्त्या मया आत्मा वृथा परितापितः–जिच्या उपजीविकेचें साधन अतिशय निंद्य आहे, कारण जी देहविक्रयवृत्तीनें रहात आहे अशा मीं आपल्या आत्म्याला व्यर्थ संताप दिला. **अर्थतृषः अनुशोच्यात् स्त्रैणात् नरात् क्रीतेन आत्मना वित्तं रतिं इच्छती**–कारण धनाविषयीं लुब्ध व त्यामुळेंच अनुशोचनीय अशा स्त्रीलंपट पुरुषापासून त्यानें विकत घेतलेल्या या शरीरानें धन व रति यांची इच्छा करणाऱ्या मीं खरोखर आपल्या जिवाला व्यर्थ ताप दिला. ३१.

जारपुरुषापासोनि सुख । इच्छितें ते मी केवळ मूर्ख । वृथा परितापू केला देख । मज असुख म्यां दिधलें ॥ २५ ॥ स्त्रैण पुरुष ते नराधम । वेश्यागामी त्याहूनि अधम । त्यांत कृपणु तो अधमाधम । तयांचा संगम मी वांछिती ॥ २६ ॥ जितुक्या अतिनिंदका वृत्ती । मज आतळतां त्या भीती । योनिद्वारें जीविकास्थिती । नीच याती व्यभिचारू ॥ २७ ॥ अल्प द्रव्य जेणें देणें । त्याची जाती कोण हें नाहीं पहाणें । याहोनि काय लाजिरवाणें । निंदित जिणें पैं माझें ॥ २८ ॥ जया पुरुषासी देह विकणें । तें अत्यंत हीनदीनपणें । काय सांगों त्याचीं लक्षणें । सर्वगुणें अपूर्ण ॥ २९ ॥ वित्त नेदवे कृपणता । काम न पुरवे पुरता । प्रीति न करवे तत्त्वतां । भेटी मागुता तो नेदी ॥२३०॥ ऐशियापासाव सुख । वांछितां वाढे परम दुःख । जळो त्याचें न पाहें मुख । वोकारी देख येतसे ॥ ३१ ॥ एवं जारपुरुषाची स्थिती । आठवितां चिळसी येती । पुरे पुरे ते संगती । चित्तवृत्ति विटली ॥ ३२ ॥

यदस्थिभिर्निर्मितवंशवंश्यस्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धम् ।
क्षरन्नवद्वारमगारमेतद्विण्मूत्रपूर्णं मदुपैति काऽन्या ॥ ३२ ॥

नरशरीर गृह सांकडें । आडींपाखाड्या नुसधीं हाडें । अस्थींच्या मेढी दोहींकडे । वोलेनि कातडें मढियेलें ॥ ३३ ॥ त्यासी सर्वांगीं सगळे । दिधले रोमावळीचे खिळे । घालूनि नखाचे खोबळे । अग्री अंगवळे बूजिले ॥ ३४ ॥ अस्थि मांस चर्मबांधा । सर्वांगीं आंवळूनि दिधला सांदा । रंगीत चर्मरसना स्वादा । पुढिले बांधा बांधिली ॥ ३५ ॥ वायुप्रसरणपरिचारें । केलीं प्राणापानरंध्रें । वरिले डळमळीत

आपल्या जारापासून सुखाची इच्छा करणारी मी खरोखर केवढी मूर्ख, मीं व्यर्थ जीवाला त्रास करून घेतला आणि स्वतःलाच दुःख दिलें. २५ स्त्रैण पुरुष अधम होत. वेश्यागमनी त्यांहून अधम. त्यांत कृपण तर अधमाधम होत. अशा दुर्जनांच्या समागमाची मीं इच्छा केली. २६ अत्यंत निंद्य वृत्तीहि माझ्याजवळ येण्यास भितात. शरीरविक्रयावर निर्वाह, हीन जाती व त्यांत व्यभिचार. २७ जो कोणी अल्प द्रव्य देईल त्याची जातदेखील पहावयाची नाहीं, यापेक्षां अधिक लाजिरवाणी गोष्ट काय असणार ! खरोखर माझें जीवित निंद्य आहे. २८ अत्यंत हीन-दीनपणानें ज्याला देह विकावयाचा, त्याच्या अंगीं एकहि पुरता गुण नसावयाचा. त्याचें वर्णन काय करावें ! २९ कृपणतेमुळें ज्याला द्रव्य देववत नाहीं, कामतृप्ति करवत नाहीं व प्रेमाचें तर नांवहि नाहीं. कारण जो एकदा येऊन गेला त्यानें पुनः कधीं तोंडहि दाखविलें नाहीं. २३० अशा लोकांकडून सुखाची इच्छा केली म्हणजे दुःख मात्र अतिशय वाढतें ! जळो तो पुरुष. त्याचें तोंडहि पाहूं नये. त्याला पहातांच ओकारी येते. ३१ सारांश जारपुरुषाच्या स्थितीची आठवण झाली कीं, अगदीं किळस येते. पुरे झाली त्याची संगति. मन विटून गेलें. २३२.

—' खरोखर अतिशय किळसवाणें कर्म करणाऱ्या मला धिक्कार असो, ' असें पिंगला पुढील श्लोकांत सांगते—

यत् अस्थिभिः निर्मितवंशवंश्यस्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धम् क्षरन्नवद्वारं विण्मूत्रपूर्णं अगारं एतत् मत् अन्या का उपैति—जें हाडांचेच वंश, वंश्य व स्थूणा यांनीं निर्मिलेलें (स्थूणा म्ह० घराचा धारण, वंश म्ह० त्यावर बसविलेलें आढें व वंश्य म्ह० त्या पाखयाला बांधलेले वेळू.) त्वचा, रोम व नखें यांनीं झांकलेलें, ज्याचीं नवद्वारें सतत मलांचा स्राव करीत आहेत, जें विष्ठा व मूत्र यानीं भरलेलें आहे, अशा या गृहरूप मनुष्यशरीराचें माझ्याहून दुसरी कोणती स्त्री कांतबुद्धीनें सेवन करील ! ३२.

नरदेहरूपी घर मोठें अमंगळ आहे. त्याला हाडाचें आढें व हाडाचींच पाखीं आहेत. दोहोंकडे हाडांच्या मेढी ओल्या कातड्यानें मढविलेल्या आहेत. ३३ त्याच्या सर्व अंगावर लोमरूपी खिळे ठोकिले आहेत. वरून नखांच्या खोबळी बसवून बोटांचीं टोकें बंद करून टाकिलीं आहेत. ३४ हाडें, मांस, कातडें हीं घट्ट बांधून त्यांत सांधे बसविले आणि रंगीत कातड्याची जीभ रस चाखण्यासाठीं पुढें तयार करून ठेविली. ३५ वायूचे श्वासोच्छ्वास चालण्या-

शिखरें । बालांकुरें लाविलीं ॥ ३६ ॥ बुजूनि भीतरील सवडी । बांधाटिलें नवनाडी । विष्ठामूत्रांची गाढी । नित्य परवडी सांठवण ॥ ३७ ॥ भीतरिले अवकाशीं । दुर्गंधि उठली कैशी । तेचि प्रवाह अहर्निशीं । नवद्वारांसीं वाहताती ॥ ३८ ॥ अखंड पऱ्हवे वाहती मळें । देखोनि ज्याचें तो कांटाळे । अहर्निशीं धुतां जळें । कदा निर्मळे ते नव्हती ॥ ३९ ॥ सांगतांचि हे गोष्टी । ओकारी येतसे पोटीं । ऐशियास मी भुलल्यें करंटी । विवेकदृष्टीं न पाहें २४० अस्थिमांसाचा कोथळा । विष्ठामूत्राचा गोळा । म्यां अलिंगीला वेळोवेळां । जळो कंटाळा न येचि ॥ ४१ ॥

विदेहानां पुरे ह्यस्मिन्नहमेकैव मूढधीः । याऽन्यमिच्छन्त्यसत्यस्मादात्मदात्काममच्युतात् ॥ ३३ ॥

ये विदेहाचे नगरीं । मूर्ख मीचि एक देहधारी । हृदयस्थ सांडूनि श्रीहरी । असंतां नरीं व्यभिचारु ॥ ४२ ॥ असंत पुरुष नेणों किती । म्यां भोगिले अहोरातीं । सुख न पवेंचि निश्चितीं । रति भगवंतीं जंव नाहीं ॥ ४३ ॥ जो निकटवर्ती हृदयस्थु । पुरुषीं पुरुषोत्तम अच्युतु । वीर्यच्युतीवीण रमवितु । संतोषें देतु निजात्मता ॥ ४४ ॥ अच्युतें ज्यासी निजसुख दिधलें । तें सुख च्यवेना कांहीं केलें । ऐशिया हृदयस्था विसरलें । आणिका भुललें अकामदा ॥ ४५ ॥ अकामद तें नाशवंत । त्यासीं संग केलिया दुःखचि देत । कैसें माझें मूर्ख चित्त । त्यासीं आसक्त पैं होतें ॥ ४६ ॥ त्या आसक्तीची जाली तडातोडी । लागली अच्युतसुखाची गोडी । ज्याचें सुख भोगितां चढोवढी । घडियाघडी वाढतें ॥ ४७ ॥

साठीं प्राण व अपान यांचीं झरोकीं तयार केलीं व वरच्या हलणाऱ्या शिखरावर केसांचीं रोपें लाविलीं. ३६ आंतील आकाश भरून काढून नवनाड्या बांधून टाकिल्या. तेथें मल-मूत्राची नित्य सांठवण केली आहे. ३७ त्यामुळें आंतल्या पोकळींत कोण दुर्गंधी उठते. नवद्वारांनीं अहोरात्र त्याचाच प्रवाह वहात असतो. ३८ अशा मोऱ्या घाणीनें अखंड भरलेल्या पाहून ज्याची त्यालाच किळस येते. रात्रंदिवस पाण्यानें धुवूनहि त्या कधीं स्वच्छ होत नाहींत. ३९ या गोष्टी सांगतांनाच पोटांत कालवूं लागतें, व ओकारी येते. पण मी कपाळकरंटी अशा देहालाहि भाळलें. विवेकदृष्टीनें कधीं पाहिलेंच नाहीं. २४० असलें हें हाडा-मासांचें पोतडें, मल-मूत्राचा गोळा मीं वेळोवेळीं आलिंगिला जळो तो देह. मला त्याचा कंटाळाहि कधीं आला नाहीं. २४१.

—सत्संगति असतांनाहि मला कोण हा मोह पडला असें पिंगला म्हणते—

अस्मिन् हि विदेहानां पुरे अहं एव एका मूढधीः—या विदेहराजाच्या नगरींत मीच एक मूढबुद्धि आहें. **या असती अस्मात् कामदात् अच्युतात् अन्यं कामं इच्छंती**—कीं जी मी असाध्वी या आत्मसमर्पण करणाऱ्या अच्युताहून निराळ्या भोगाची इच्छा करणारी आहें. ३३.

या विदेह जनकाच्या नगरांत मीच एक काय ती मूर्ख स्त्री आहें. कारण हृदयस्थ श्रीहरीला सोडून मीं निंद्य पुरुषांशीं व्यभिचार केला. ४२ मीं असे किती दुर्व्यसनी पुरुष रात्रंदिवस भोगिले त्यांची गणतीच नाहीं. परंतु जोंपर्यंत भगवंतावर माझी आसक्ति नव्हती तोंवर मला निश्चित सुख मुळींच लाधलें नाहीं. ४३ जो अंतःकरणांत सदा समीप राहणारा अच्युत, पुरुषांतील पुरुषोत्तम, उर्ध्वरेता, तो मोठ्या संतोषानेंच आत्मपद देतो. ४४ आणि अच्युतानें एकदा आत्मसुख दिलें कीं, तें सुख केव्हांहि नष्ट होत नाहीं. अशा हृदयस्थ परमात्म्याला मी विसरलें आणि असमर्थ पुरुषांना भाळलें. ४५ जें इच्छा तृप्त करीत नाहीं, तें विनाशीच असतें. त्याच्या समागमानें दुःखच होणार. पण माझें चित्त किती मूढ पहा ! मी त्यावर आसक्त होऊन राहिलें; ४६ पण आतां त्या आसक्तीची ताटातूट झाली व जें सुख भोगीत असतां उत्तरोत्तर अधिक अधिकच वाढत जातें, त्या अक्षयसुखाची मला गोडी लागली आहे. २४७.

सुहृत्प्रेष्ठतमो नाथ आत्मा चायं शरीरिणाम् । तं विक्रीयात्मनैवाहं रमेऽनेन यथा रमा ॥ ३४ ॥

जो सोयरा माझा हृदयस्थु । सुख प्रीति प्रिय अच्युतु । तोचि अंतरात्मा सर्वगतू । नाथ कांतू तो माझा ॥ ४८ ॥ त्यासीच आपुलें संवसाटी । विकत घेईन उठाउठी । परमानंदें देईन मिठी । गोठी चावटी सांडोनी ॥ ४९ ॥ रमा जाली पायांची दासी । मी भोगीन अनारिसी । सर्वकाळ सर्वदेशीं । सर्वरूपेंसीं सर्वस्वें ॥ २५० ॥

कियत्प्रियं ते व्यभजन् कामा ये कामदा नराः । आद्यन्तवन्तो भार्याया देवा वा कालविद्रुताः ॥ ३५ ॥

सांडूनि हृदयस्था अच्युतातें । बरावें बरां निर्दैवांतें । तंव ते द्वैतभयें भयचकिते । काळग्रस्ते सर्वदा ॥ ५१ ॥ जे निजभयें सर्वदा दुःखी । ते भार्येसी काय करिती सुखी । अवघीं पडलीं काळमुखीं । न दिसे ये लोकीं सुखदाता ॥ ५२ ॥ असो नराची ऐसी गती । करूं अमरांमाजीं अमरपती । विळांत ते चौदा निमती । पदच्युति अमरेंद्रा ॥ ५३ ॥ एवं सुर नरलोक लोकीं । आत्ममरणें सदा दुःखी । ते केवीं भार्येसी करिती सुखी । भजावें मूर्खीं ते ठायीं ॥ ५४ ॥ धन्य माझी भाग्यप्राप्ती । येचि क्षणीं येचि रातीं । झाली विवेकवैराग्यप्राप्ती । रमापति तुष्टला ॥ ५५ ॥

नूनं मे भगवान्प्रीतो विष्णुः केनापि कर्मणा । निर्वेदोऽयं दुराशाया यन्मे जातः सुखावहः ॥ ३६ ॥

—याप्रमाणें विरक्त होऊन 'आतां यापुढें मी असें करीन' असें ती पिंगला म्हणते—

अयं शरीरिणां सुहृत् प्रेष्ठतमः नाथः आत्मा च—हा अच्युत देहवान् जीवांचा सुहृद्, अत्यंत प्रिय, नाथ व आत्मा आहे. अहं आत्मना एव तं विक्रीय अनेन यथा रमा तथा रमे—मी आतां स्वतःलाच त्याला विकून त्याच्याशीं रमेप्रमाणें रममाण होतें. ३४.

जो माझा हृदयस्थ सोयरा, माझा सुखदाता, मला प्रिय असलेला, मजवर प्रेम करणारा अच्युत, तोच सर्वव्यापी परमात्मा माझा प्रिय स्वामी व तोच माझा पति आहे. ४८ त्यालाच मी माझा स्वतःचा मोबदला देऊन सत्वर विकत घेईन आणि विलासाच्या गोष्टी टाकून त्याला मी परमानंदानें मिठी मारीन. ४९ रमा त्याच्या पायाची दासी झाली, पण मी निराळ्या प्रकारानें सर्वदा, सर्वत्र, सर्वरूपानें व सर्वस्वानें त्याच्याशीं सुख भोगीन. २५०.

—पिंगला दुसऱ्या पुरुषांचें असेव्यत्व दाखविते—

आद्यंतवंतः ये कामदाः नराः—उत्पत्ति-विनाशशील असे जे विषयभोग देणारे पुरुष, कालविद्रुताः देवाः वा—किंवा जे कालानें परिछिन्न झालेले देव, ते भार्यायाः कियत्प्रियं व्यभजन्—त्यांनीं आपल्या भार्येचें कितीसें प्रिय केलें आहे ! [कांहीं नाहीं. यास्तव यालोकीं किंवा परलोकीं त्या अच्युतावांचून कोणीहि सेव्य नाहीं.] ३५.

हृदयस्थ परमात्म्याला टाकून जर दैवहीन पुरुषांना वरावें तर तें द्वैताच्या भीतीनें घाबरलेले व सर्वदा कालानें ग्रासलेले असतात. ५१ जे आपल्याच चिंतेंत नेहमीं निमग्न असतात ते आपल्या भार्येला सुखी कसे करणार ! ते सर्व मृत्युमुखांत पडलेले आहेत. त्यामुळें मला या लोकीं सुख देणारा कोणी दिसत नाहीं. ५२ मानवांची ही स्थिति ! देवांतील इंद्राला स्वामी करावें तर ब्रह्मदेवाच्या आयुष्यांत चौदा इंद्र मरतात. याप्रमाणें इंद्रहि अखेर पदापासून च्युत होतो. ५३ तात्पर्य देव आणि मानव दोघेहि जर स्वतःच्या मरणाच्या काळजीनें सदा दुःखी असतात तर ते आपल्या अर्धांगीला सुखी कसे करणार ! तेव्हां मूर्खांनींच त्यांच्या नादीं लागावें. ५४ आज धन्य माझें भाग्य ! या रात्रीं, याच क्षणीं मला विवेक व वैराग्य यांची प्राप्ति झाली व श्रीहरि संतुष्ट झाला. २५५.

—याप्रमाणें निश्चय करून पिंगला आपल्या भाग्याचें अभिनंदन करिते—

नूनं मे केन अपि कर्मणा भगवान् विष्णुः प्रीतः—खरोखर माझ्या कोणत्या तरी एखाद्या पूर्वकर्मामुळें भगवान् विष्णु मजवर प्रसन्न झाला आहे. यत् दुराशायाः मे अयं सुखावहः निर्वेदः जातः—कारण कीं, जिची आशा दुष्ट आहे त्या मला हा सुखावह निर्वेद प्राप्त झाला. ३६.

ये जन्मींचें माझें कर्म । पाहतां केवळ निंद्य धर्म । मज तुष्टला पुरुषोत्तम । पूर्वजन्मसामग्रीं ॥ ५६ ॥ मज कैचें पूर्वजन्मीं साधन । ज्याचें नाम पतितपावन । कृपाळु जो जनार्दन । त्याचे कृपेनें हें घडलें ॥ ५७ ॥ दुष्ट दुराशा व्यभिचारु । भगद्वारा चालवीं संसारू । तिसी मज वैराग्ययुक्त विचारू । विष्णु साचारू तुष्टला ॥ ५८ ॥ जरी असतें पूर्वसाधन । तरी निंद्य नव्हतें मी आपण । योनिद्वारा कर्माचरण । पतित पूर्ण मी एक ॥ ५९ ॥ यापरी मी पूर्ण पतित । पतितपावन जगन्नाथ । तेणें कृपा करून येथ । केले विवेकयुक्त वैरागी ॥ २६० ॥ तेणें वैराग्यविचारें देख । दुष्ट दुराशेचें फिटलें दुःख । मज झालें परम सुख । निजसंतोख पावलें ॥ ६१ ॥ हें दुःख आदळतां अंगासी । वैराग्य नुपजे अभाग्यासी । भगवंतें कृपा केली कैशी । दुःखें निजसुखासी दीधलें ॥ ६२ ॥

मैवं स्युर्मन्दभाग्यायाः क्लेशा निर्वेदहेतवः । येनानुबन्धं निर्हृत्य पुरुषः शममृच्छति ॥ ३७ ॥

अंगीं आदळतां दुःखद्वंद्व । अभाग्यासी ये सबळ क्रोध । थिता विवेक होय अंध । भाग्यमंद ते जाणा ॥ ६३ ॥ दुःख देखतांचि दृष्टीं । ज्यासी वैराग्य विवेकेंसीं उठी । तेणें छेदूनि स्नेहहृदयगांठी । पावे उठाउठी निजसुख ॥ ६४ ॥ पुरुषांसी परमनिधान । विवेकयुक्त वैराग्य जाण । तेणें होऊनियां प्रसन्न । समाधान पावती ॥ ६५ ॥ मी पूर्वीं परम अभाग्य । महापुरुषांचें जें निजभाग्य । तें भगवंतें दिधलें वैराग्य । जालें श्लाघ्य मी तिहीं लोकीं ॥ ६६ ॥

या जन्मींचें माझें चरित्र पाहिलें तर तें केवळ निंद्य कर्मांनें युक्त आहे. परंतु पूर्वजन्मींचें कांहीं भाग्य होतें म्हणूनच पुरुषोत्तम मजवर प्रसन्न झाला. ५६ किंवा माझें पूर्वजन्मींचें कर्म तरी काय असणार ! पतितपावन ज्याला नांव आहे त्या परम कृपाळु जनार्दनाच्या कृपेनेंच हें घडलें. ५७ दुष्ट, दुर्व्यसनी, व्यभिचारी, देहविक्रय करून प्रपंच चालविणारी जी मी, त्या मला वैराग्याचा विचार कोठचा सुचणार ! पपरमात्मा मजवर प्रसन्न झाला, हेंच खरें ! ५८ पूर्वजन्मींचें जर कांहीं सुकृत असतें तर मी निंद्य कर्मांत प्रवृत्त झालेंच नसतें. देह भ्रष्ट करून मी पूर्णपणें पतित बनलें नसतें. ५९ अशाप्रकारें मी जरी पूर्ण पतित आहें, तरी जगदीश्वर पतितपावन असल्यामुळें त्यानें मजवर कृपा करून माझ्या मनांत विवेकयुक्त विरक्ति उत्पन्न केली. २६० त्या वैराग्याच्या विचारानें दुर्वासनेमुळें होणारें माझें दुःख नाहींसें झालें. मी परम सुखी झालें आणि मला आत्मानंदाचा लाभ झाला. ६१ अभागी लोकांना दुःखाचा डोंगर कोसळला तरी विरक्ति कधीं येत नाहीं. पण भगवानानें मजवर कशी कृपा केली, पहा ! त्यानें मला दुःखद्वारां आत्मसुख दिलें. २६२.

—' धन न मिळाल्यामुळें तूं अशी वैतागली आहेस, तुझ्यावर विष्णु प्रसन्न कसा होणार ' असें कोणी म्हणेल म्हणून पिंगला सांगते—

मन्दभाग्यायाः क्लेशाः एवं निर्वेदहेतवः मा स्युः—मज मंदभागिनीचे क्लेश असे विरक्तीला कारण झाले नसते, (मी जर भाग्यहीन असतें तर मला असें वैराग्य उत्पन्न करणारे क्लेश झाले नसते, असा भावार्थ.) येन अनुबंधं निर्हृत्य पुरुषः शमं ऋच्छति—कीं ज्या वैराग्याच्या योगानें गृहादिकांचा त्याग करून पुरुष शांतीला प्राप्त होतो. (तशा वैराग्याला कारण होणारे क्लेश मला झाले म्हणून मी धन्य आहें. भाग्यहीन नव्हे.) ३७.

दुःखरूपी द्वंद्व अंगावर येऊन पडलें म्हणजे अभाग्याला फार क्रोध येतो. पण ज्यांच्या अंगीं असलेला विचार अंध होतो, ते भाग्यहीन होत, असें समजावें. ६३ दुःख नजरेस पडतांच ज्याला विवेकयुक्तवैराग्य येतें, तो अंतःकरणांतील स्नेहरूपी गांठ तोडून ताबडतोब आत्मसुखाला प्राप्त होतो. ६४ ' विवेकयुक्त वैराग्य ' हाच मनुष्याचा अमूल्य ठेवा आहे. त्याच्या योगानें तो संतुष्ट होऊन समाधान पावतो. ६५ मी मूळची अत्यंत अभागी, पण भगवानानें दैववान् पुरुषाचें जें मोठें भाग्य तें वैराग्यच मला दिलें. त्यामुळें मी त्रैलोक्यांत धन्य झालें. २६६.

तेनोपकृतमादाय शिरसा ग्राम्यसङ्गताः । त्यक्त्वा दुराशाः शरणं व्रजामि तमधीश्वरम् ॥ ३८ ॥

कृपा करोनि भगवंतें । निजवैराग्य दिधलें मातें । तेणें सांडविलें दुराशेतें । ग्राम्य विषयांतें छेदिलें ॥ ६७ ॥ तो उपकार मानूनियां माथां । त्यासी मी शरण जाईन आतां । जो सर्वाधीश नियंता । त्या कृष्णनाथा मी शरण ॥ ६८ ॥

सन्तुष्टा श्रद्दधत्येतद्यथालाभेन जीवती । विहराम्यमुनैवाहमात्मना रमणेन वै ॥ ३९ ॥

शरण गेलियापाठीं । सहज संतुष्ट मी ये सृष्टीं । स्वभावें सत्श्रद्धा पोटीं । जीविका गांठी अदृष्ट ॥ ६९ ॥ मुनीश्वर भोगिती निजात्मा । त्या मी भोगीन आत्मयारामा । जो कां पुरवी निष्कामकामा । तो परमात्मा वल्लभू ॥ २७० ॥ ब्रह्मादिक समर्थ असती । ते सांडूनियां निश्चितीं । भगवद्भजनाची स्थिती । अतिप्रीती कां म्हणसी ॥ ७१ ॥ मजसारखिया दुराचारी । जड जीवांतें उद्धरी । तारकु तोचि भवसागरीं । स्वामी श्रीहरि कृपाळु ॥ ७२ ॥

संसारकूपे पतितं विषयैर्मुषितेक्षणम् । ग्रस्तं कालाहिनाऽऽत्मानं कोऽन्यस्त्रातुमधीश्वरः ॥ ४० ॥

संसारलक्षण कूप अंध । तेथ विषयदृष्टी विषयांध । पडोनि गेले अधाध । बुद्धिमंद उपायीं ॥ ७३ ॥ ते कल्पनाजळीं बुडाले । वासनाकल्लोळीं कवळले । दंभमदादि जळचरीं तोडिले । तृष्णेच्या पडले कर्दमीं ॥ ७४ ॥ दुःखाच्या खडकीं आदळले । स्वर्गपायरीसीं अडकले । तेथूनहि एक पडले ।

तेन उपकृतं शिरसा आदाय–यास्तव त्या विष्णूनें केलेल्या या वैराग्यरूप उपकाराचें शिरसा ग्रहण करून, ग्राम्यसङ्गताः दुराशाः त्यक्त्वा तं अधीश्वरम् शरणं व्रजामि–ग्राम्य पुरुष किंवा विषय या विषयींच्या दुराशा सोडून मी त्या सर्वेश्वराला शरण जातें. ३८.

भगवानानें दयाळू होऊन मला विरक्ति दिली. त्यामुळें माझ्या दुर्वासनेचा नाश झाला आणि मीं ग्राम्यविषय तोडून टाकिले. ६७ हे त्याचे माझ्यावर उपकारच झाले आहेत, असें मानून त्या सर्वेश्वर, नियंत्या जगन्नाथाला मी शरण आलें आहें. २६८.

—तूं त्याला शरण कशी जाणार ? उत्तर—

अहं संतुष्टा एतत् श्रद्दधती यथा लाभेन जीवती अमुना एव आत्मना रमणेन विहरामि वै–मी संतुष्ट, यावर श्रद्धा ठेवणारी, वेळेला जें मिळेल त्यावर उपजीविका करणारी अशी होत्साती याच आत्मरूप रमणाबरोबर विहार करीन ३९.

त्याला शरण गेलें असतां मी या जगांत सहज सुखी होईन. मनांत साहजिकच सात्त्विक श्रद्धा उत्पन्न होईल आणि मी जीविताचा भार अदृष्टावर ठेवीन. ६९ मुनीश्वर ज्या आत्मस्वरूपाचा अनुभव घेतात त्याचाच मीहि उपभोग घेईन. निष्काम इच्छा पुरविणारा तो परमात्माच माझा वल्लभ आहे. २७० वस्तुतः ब्रह्मादि सर्व समर्थ असतां त्यांना सोडून भगवद्भजनाचीच तुला आवड कां ? असें जर म्हणशील ७१ तर तो स्वामी कृपाळु श्रीहरि, माझ्यासारख्या दुराचरणी जड जीवांचा उद्धार करितो आणि तोच संसारसागरांतून तारितो. २७२.

—' पण ब्रह्मादि इतर देवांना सोडून या अच्युताशींच मी रत होईन ' असा निश्चय कां करितेस ? उत्तर—

संसारकूपे पतितं–या संसाररूप गहन कूपांत पडलेल्या, विषयैः मुषितक्षेणं–विषयांनीं ज्याच्या विवेकाचा अपहार केला आहे, कालाहिना ग्रस्तं–काळरूपी सर्पानें ग्रासलेल्या, आत्मानं–आत्म्याला, अन्यः कः त्रातुं अधीश्वरः–दुसरा कोण रक्षिण्यास समर्थ आहे ! ४०.

अंधकूपाप्रमाणें संसाराचें स्वरूप आहे. केवळ विषयांकडे दृष्टि ठेवून विषयांध झालेले लोक त्यांत पडून अधोगतीला गेले आहेत. ७३ ते कल्पनेच्या जलांत बुडाले. वासनारूपी लाटांत गुरफटले. दंभ, मद इत्यादि जलचरांनीं त्यांना तोडिलें आणि ते तृष्णारूपी चिखलांत रुतले, ७४ दुःखरूपी खडकावर जाऊन आदळले व स्वर्गाच्या

निबुजले भवजळें ॥ ७५ ॥ नास्तिकें गेलीं सबुड बुडीं । कर्मठीं धरिल्या कर्मदरडी । वेदबाह्य तीं बापुडीं । पडलीं देव्हडीतळवटीं ॥ ७६ ॥ निंदेचे मूळ कांटे । फुटोनि निघाले उफराटे । द्वेषाचे पाथर मोटे । हृदय फुटे लागतां ॥ ७७ ॥ कामाचीं उकळी प्रबळ । भीतरूनि बाहेरीं ये सबळ । तेणें डहुळलें तें जळ । होय खळबळ जीवासी ॥ ७८ ॥ सुटले क्रोधाचे चिरे । वरी पडिल्या उरी नुरे । वनितामगरीं नेलें पुरें । विवरद्वारें आंतौतें ॥ ७९ ॥ तेथ अवघियांसी एकसरें । गिळिलें काळें काळअजगरें । विखें घारलें थोरें घोरें । ज्ञान पाठिमोरें सर्वांसी ॥ २८० ॥ सर्प चढलिया माणुसा । गूळ कडू लागे कैसा । निंब खाये घसघसां । गोड गूळसा म्हणौनि ॥ ८१ ॥ केवळ विषप्राय विषयो कडू । तो प्रपंचिया जाला गोडू । अमृतप्राय परमार्थ गोडू । तो जाला कडू विषयिकां ॥ ८२ ॥ कूपाबाहेरी वासु ज्यांसी । ते न देखती कूपाआंतुलांसी । कूपांतले बाहेरिलांसी । कदाकाळेंसीं न देखती ॥ ८३ ॥ ऐसिया पीडतयां जीवांसी । काढावया धिंवसा नव्हे कोणासी । तुजवांचोनि हृषीकेशी । पाव वेगेंसीं कृपाळुवा ॥ ८४ ॥ एवं दुःखकूपपतितां । हृदयस्थु भगवंतुचि त्राता । धांव पांव कृष्णनाथा । भवव्यथा निवारीं ॥ ८५ ॥ ऐसें जाणोनि तत्त्वतां । त्याच्या चरणा शरण आतां । शरण गेलिया सर्वथा । सहज भवव्यथा निवारे ॥ ८६ ॥

आत्मैव ह्यात्मनो गोप्ता निर्विद्येत यदाखिलात् । अप्रमत्त इदं पश्येद्ग्रस्तं कालाहिना जगत् ॥ ४१ ॥

पायरीला ठेंचाळून पडले. त्यांतील कांहीं संसारसागरांत गुदमरून गेले. ७५ त्यांपैकीं नास्तिकांना तर जलसमाधीच मिळाली. कर्मठांनीं कर्मानुष्ठानाच्या दरडी गांठल्या व वेदबाह्य वागणारे बिचारे चौकीच्या अधोभागीं जाऊन पडले. ७६ तेथें निंदारूपी कांटे मोठ्या जोमानें उंच वाढले. द्वेषरूपी मोठाले दगड लागतांच हृदय फुटलें. ७७ कामाची प्रबळ उसळी आंतून मोठ्या जोरानें उडाली व सर्व जलाची खळबळ उडून जीव कासावीस झाला ७८ व तशा स्थितींत क्रोधाचे सुटलेले चिरे जर कां डोक्यावर पडले तर मग कांहीं बाकीच उरत नाहीं. तेथें स्त्रीरूपी सुसरींनीं विवरांत ओढून नेलें ७९ व काळरूपी अजगरानें सर्वांना एकदम गिळून टाकिलें. त्याचें भयंकर विष चढून सर्वांना ज्ञान पारखें झालें. २८० सर्पाचें विष चढलेला मनुष्य जसा गोड गुळाला कडु समजतो आणि कडुलिंबाला गोड समजून मोठ्या चवीनें खातो, ८१ तसाच संसारासक्त मनुष्य विषासारख्या कडू विषयांना गोड समजून त्यांचें सेवन करितो. या विषयासक्त लोकांना अमृततुल्य परमार्थ अत्यंत कडू लागतो. ८२ या संसाररूपी कूपाच्या बाहेर जे असतात त्यांना आंतलें कांहीं कळत नाहीं व कूपांत पडलेले बाहेरच्या लोकांना कधींकाळीं देखील पहात नाहींत. ८३ हे हृषीकेशा ! अशा पीडलेल्या जीवांना बाहेर काढण्याचें धैर्य तुजवांचून दुसऱ्या कोणालाहि नाहीं. हे दयाघना, सत्वर पाव. ८४ अशा दुःखरूपी कूपांत पडलेल्या लोकांचें रक्षण करणारा तूंच एक हृदयस्थ परमात्मा आहेस ! हे कृष्णनाथा ! धांव, पाव आणि ही संसारव्यथा दूर कर. ८५ मी हें तत्त्वतां जाणून त्याच्याच चरणांना शरण गेलें आहें. आतां माझ्या भवव्यथेचें सहज निवारण होईल. २८६.

—'तर मग काय तूं आत्मरक्षणाच्या इच्छेनें त्याला भजणार ?' उत्तर-'नाहीं. सर्व विषयांपासून विरक्त होऊन भगवद्भजनामध्यें प्रवृत्त झालेला आत्मा आपलें रक्षण करण्यास समर्थ असल्यामुळें मी त्याचेंच भजन करीन' असें पिंगला सांगते—

यदा इदं जगत् कालाहिना ग्रस्तं पश्येत्—जेव्हां हें सर्व जगत् कालरूपी सर्पानें ग्रासलेलें आहे असें पाहील व त्यामुळेंच, अप्रमत्तः अखिलात् निर्विद्येत—सावधान होऊन या लोकांतील व परलोकांतील भोगविषयीं विरक्त होईल, तदा हि आत्मा एव आत्मनः गोप्ता—तेव्हां एक आत्माच आत्म्याचा रक्षक होईल. [वास्तव मी केवळ प्रेमानेंच त्याचें भजन करितें.] ४१.

ऐसें कळलें जी तत्त्वतां । येथ आपणचि आपणियां त्राता । सर्व पदार्थीं सर्वथा । निर्वेदता दृढ जाल्या ॥ ८७ ॥ दृढ वैराग्यता ते ऐशी । विषयो टेंकल्या अंगासी । चेतना नव्हे इंद्रियांसी । निद्रिता-पासीं जेवीं रंभा ॥ ८८ ॥ अथवा वमिलिया अन्ना । जेवीं वांछिना रसना । तेवीं विषय देखोनि मना । न धरी वासना आसक्ती ॥ ८९ ॥ तें वैराग्य कैसेनि जोडे । तरी सावधान पाहतां रोकडें । जग काळें गिळिलें चहूंकडे । वेगळें पडे तें नाहीं ॥ २९० ॥ पिता पितामह काळें नेले । पुत्रपौत्रां काळें गिळिलें । वैराग्य नुपजे येणें बोलें । नरी नागवले नरदेहा ॥ ९१ ॥ मृत्युलोक याचें नांव । अनित्य स्वर्गाची काइसी हांव । वैराग्येंवीण निर्दैव । झाले सर्व सर्वथा ॥ ९२ ॥

ब्रा०–एवं व्यवसितमतिर्दुराशां कान्ततर्षजाम् । छित्त्वोपशममास्थाय शय्यामुपविवेश सा ॥ ४२ ॥

अवधूत म्हणे यदूसी । धन्य भाग्य तये वेश्येसी । वैराग्य उपजलें तिशीं । विवेकेंसीं निजोत्तम ॥ ९३ ॥ एवं विवंचूनि निजबुद्धी । परपुरुषदुराशा छेदी । ज्याचेनि संगें आधिव्याधी । बहु उपाधी बाधक ॥ ९४ ॥ जे उपाधीचेनि कोडें । जन्ममृत्यूंचा पूरु चढे । दुःखभोगाचें सांकडें । पाडी रोकडें जीवासी ॥ ९५ ॥ येणें वैराग्यविवेकबळें । छेदूनि दुराशेचीं मूळें । उपरमु पावली एके वेळे । निजात्म-सोहळे ते भोगी ॥ ९६ ॥ नित्य सिध्दु सुखदाता । तो हृदयस्थु कांत आश्रितां । विकल्प सांडूनि चित्ता । वेगीं हृदयस्था मानली ॥ ९७ ॥ त्यासी देखतां अनुभवाचे दिठीं । ऐक्यभावें घातली मिठी । निजसुख पावली गोरटी । उठाउठीं तत्काळ ॥ ९८ ॥ बोलु घेऊनि गेला बोली । लाज लाजोनियां गेली । दृश्य द्रष्टा दशा ठेली । वाट मोडिली विषयांची ॥ ९९ ॥ सुखें सुखावलें मानस । तें सुखरूप जालें निःशेष ।

या जगांत जीव आपणच आपला त्राता आहे हें मला तत्त्वतः कळलें आणि सर्व वस्तूंविषयीं पूर्ण विरक्ति आली. ८७ (सु. गी. ६·५ पृ. १२४) गाढ निजलेल्या माणसापाशीं रंभा जरी आली तरी तो जसा निर्विकार असतो तसाच विषयांचा स्पर्श झाला तरी इंद्रियांनीं निर्विकार रहाणें ८८ किंवा वमन केलेल्या अन्नावर जशी रसनेची कधीं वासना जात नाहीं, त्याप्रमाणें विषयांना पाहून मन त्यांत आसक्त न होणें, हेंच दृढ वैराग्य होय. ८९ तें वैराग्य कसें प्राप्त होतें ! असें जर विचाराल तर सांगतें. विवेकदृष्टीनें पाहूं गेलें असतां सर्व जगत् चोहोंकडून काळानें ग्रासलेलें दिसतें. त्यांतून सुटण्याला वाटच नाहीं. २९० वाडवडील, नातु-पणतू सर्वांना काळानें गिळिलें आहे, हें प्रत्यक्ष पहात असूनहि ज्यांच्या मनांत विरक्ति उत्पन्न होत नाहीं, ते नरजन्माला येऊन व्यर्थ गेले. ९१ याचें नांवच मुळीं मृत्युलोक ! अनित्य स्वर्गाची हांव तरी कशाला धरावी ! वैराग्यावांचून सर्व प्राणी सर्वथा दुर्दैवी झाले आहेत. २९२.

ब्राह्मणः उवाच–ब्राह्मण म्हणाला, **एवं व्यवसितमतिः सा**–याप्रमाणें जिची बुद्धि निश्चित झाली आहे अशी ती पिंगला, **कान्ततर्षजां दुराशां छित्वा**–पुरुषाच्या अभिलाषापासून उत्पन्न झालेल्या दुराशेचा छेद करून, **उपशमं आस्थाय**–व शांतीचा स्वीकार करून, **शय्यां उपविवेश**–शय्येवर बसली. ४२.

अवधूत यदुराजाला म्हणाला, त्या वेश्येचें भाग्य मोठें, म्हणूनच तिला विरक्ति येऊन ती असा उत्तम विवेक करण्यास समर्थ झाली. ९३ अशारीतीनें आपल्याच बुद्धीनें विवेक करून तिनें जिच्यामुळें आधि, व्याधि वगैरे अनेक उपाधी बाधक होत होत्या, ती पुरुषाविषयाची दुर्वासना घालविली. ९४ ज्या उपाधीमुळें जन्म-मृत्यूचा पूर येतो व जीवावर दुःखभोगाचें संकट ओढवतें, ९५ त्याच्या दुराशेचीं मुळें या विवेकयुक्त वैराग्याच्या सामर्थ्यानें तोडून टाकिलीं. त्याबरोबर तिला शान्ति प्राप्त झाली व तिनें आत्मसुखाचा सोहळा भोगिला. ९६ नित्य सिद्ध सुख देणारा हृदयस्थ परमात्मा आपला कांत समजून त्याचा आश्रय करितांच चित्तांतील सर्व विकल्प नाहींसे होऊन तिचा तत्काल हृदयस्थ आत्मारामानें अंगीकार केला. ९७ अनुभवदृष्टीनें त्याला पहातांच तिनें ऐक्यभावानें मिठी घातली, तसें तत्काल तिला आत्मसुख लाभलें. ९८ वाचा वाणीला घेऊन गेली. लाज लज्जित झाली. दृश्य, द्रष्टा ही भावना नाहींशीं झाली आणि विषयांचा मार्गच खुंटला. ९९ सुखानें मन प्रसन्न

संकल्पविकल्प पडिले वोस । दोघां सावकाश निजप्रीती ॥ ३०० ॥ नाबद पडलिया उदकांत । विरोनि तया गोड करित । तेवों निराशीं पावोनि भगवंत । समरसत स्वानंदें ॥ १ ॥ तेथ हेतूसी नाहीं ठावो । निमाला भावाभावो । वेडावला अनुभवो । दोघां प्रीती पाहाहो अनिवार ॥ २ ॥ सांडूनि मीतूंपणासी । खेंव दिधलें समरसीं । मग समाधीचिये सेजेशीं । निजकांतेंसीं पहुडली ॥ ३ ॥ झणें मायेची लागे दिठी । यालागीं स्फूर्तीचिये कोटी । निंबलोण गोरटी । उठाउठी वोवाळी ॥ ४ ॥ ऐसी समाधिशेजेसीं । पिंगला रिघे निजसुखेंसीं । अवधूत म्हणे यदूसी । वैराग्यें वेश्येसी उपरमु ॥ ५ ॥ वैराग्यें छेदिले आशापाश । पिंगला जाली गा निराश । निराशेंसीं असमसाहस । सुखसंतोष सर्वदा ॥ ६ ॥

आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् । यथा संछिद्य कान्ताशां सुखं सुष्वाप पिङ्गला ॥ ४३ ॥

आशा तेथ लोलुप्यता । आशेपाशीं असे दीनता । आशा तेथ ममता । असे सर्वदा नाचती ॥ ७ ॥ आशेपाशीं महाशोक । आशा करवी महादोख । आशेपाशीं पाप अशेख । असे देख तिष्ठत ॥ ८ ॥ आशेपाशीं अधर्म सकळ । आशा मानीना विटाळ । आशा नेणे काळवेळ । कर्म सकळ उच्छेदी ॥ ९ ॥ आशा अंत्यजातें उपासी । नीचसेवन आशेपाशीं । आशा न सांडी मेल्यासी । प्रेतापाशीं नेतसे ॥ ३१० ॥ आशा उपजली अनंतासी । नीच वामनत्व आलें त्यासी । आशा दीन केलें देवांसी । कथा कायसी इतरांची ॥ ११ ॥ जगाचा जो नित्य दाता । तो आशेनें केला भिकेसवता । वैश्याचे द्वारीं झाला मागता । द्वारपाळता तेणें त्यासी ॥ १२ ॥ आशा तेथ नाहीं सुख । आशेपाशीं परम दुःख ।

झालें. तें पूर्णपणें सुखरूपच झालें. संकल्प-विकल्प ओस पडले. ती आणि आत्माराम अशीं दोघें आत्मप्रेमांत निमग्न झालीं. ३०० साखर पाण्यांत पडली म्हणजे स्वतः विरघळून त्याला गोड करिते, त्याप्रमाणें भगवंतामध्यें आशेला सोडून ती त्याच्याशीं समरस झाली. १ हेतूला मुळीं जागाच उरली नाहीं. भाव-अभाव मारठून गेले. अनुभव वेडावला, अशी त्यांची परस्परांवर अनिवार प्रीति जडली. २ 'मी तूं' पणा सोडून व समरस होऊन तिनें त्याला मिठी घातली व आपल्या हृदयस्थ आत्मारामाबरोबर समाधीच्या शय्येवर तिनें शयन केलें. ३ कदाचित् मायेची दृष्ट लागेल म्हणून कोट्यवधि स्फूर्तींचें लिंबलोण त्या विलासिनीनें उतरून टाकिलें. (मूळ स्फूर्ति उत्पन्न होतांच तिचें ग्रहण करून मन इंद्रियांकडून कार्य करवित असतें. करितां सर्व अनर्थांचें मूळ जी स्फूर्ति तीच ओवाळून टाकिली कीं मायेचें कार्य खुंटलें.) ४ अशा प्रकारें पिंगला समाधिरूप शय्येवर आत्मसुख अनुभवूं लागली. अवधूत यदूला म्हणाला कीं, वेश्येला वैराग्यानें शांति प्राप्त झाली. ५ वैराग्यानें तिचे आशारूपी पाश तोडून टाकिले. पिंगला आशा-रहित झाली. त्या निरिच्छतेमुळें तिला अत्यंत सुख आणि संतोष लाभला. ३०६.

—अवधूत या आख्यानाचें फलित सांगतो—

आशा हि परमं दुःखं-आशाच अत्यंत दुःखसाधन आहे, नैराश्यं परमं सुखं—वैराग्य श्रेष्ठ सुखसाधन आहे. यथा—याविषयीं दृष्टान्त—कान्ताशां संछिद्य पिङ्गला सुखं सुष्वाप—पुरुषाविषयींची आशा सर्वथा सोडून पिंगला सुखानें निजली. ४३.

जेथें आशा तेथें लोभ, दीनपणा व ममता हीं सारखीं नाचत असतात. ७ आशेपाशीं महाशोक हजर असतो. आशा मोठालीं पातकें करविते. आशेजवळ सर्वकाल पातक तयार असतें. ८ आशेजवळ सर्व अधर्म तत्पर असतात. आशा विटाळ मानीत नाहीं. काळ-वेळ जाणत नाहीं. ती सर्व सत्कर्मांचा उच्छेद करून टाकिते. ९ आशा अंत्यजांच्या भजनीं लागते. आशा निंद्यसेवन करिते. आशा मेलेल्यासहि सोडीत नाहीं. ती संस्काररूपानें प्रेताबरोबरहि जाते. ३१० अनंताच्या मनांत आशा उत्पन्न होतांच त्याला वामनबटूचें स्वरूप प्राप्त झालें. आशेनें देवांनाहि दीन करून सोडिलें आहे, मग मानवांची काय कथा ! ११ जगताचा जो नित्य दाता अशा जगदीश्वरालाहि आशेनें भिकारी बनविलें आणि वैश्याच्या दारांत याचना करावयास लाविलें, त्यामुळें त्याला द्वारपाळ व्हावें लागलें. १२ जेथें आशा आहे, तेथें सुख नाहीं. आशेजवळ पराकाष्ठेचें दुःख आहे. आशा

आशा सर्वांसी बाधक । मुख्य दोष ते आशा ॥ १३ ॥ ज्याची आशा निःशेष जाये । तोचि परम सुख लाहे । ब्रह्मादिक वंदिती पाये । अष्टमा सिद्धी राहे दासीत्वें ॥ १४ ॥ निराशांचा शुद्ध भावो । निराशांपाशीं तिष्ठे देवो । निराशांचें वचन पाहाहो । रावो देवो नुल्लंघी ॥ १५ ॥ निराश तोंचि सद्बुद्धि । निराश तोचि विवेकनिधी । चारी मुक्ती पदोपदीं । नैराश्य आधीं वंदिती ॥ १६ ॥ निराशा तीर्थांचें तीर्थ । निराशा मुमुक्षूचा अर्थ । निराशेपाशीं परमार्थ । असे तिष्ठत निरंतर ॥ १७ ॥ जाण नैराश्यतेपाशीं । वैराग्य होऊनि असे दासी । निराश पाहावया अहर्निशीं । हृषीकेशी चिंतितू ॥ १८ ॥ निराशा देखोनि पळे दुःख । निराशेमाजीं नित्यसुख । निराशेपाशीं संतोख । यथासुखें क्रीडतु ॥ १९ ॥ नैराश्याचे भेटीसी पाहों । धांवे वैकुंठींचा रावो । नैराश्याचा सहज स्वभावो । महादेवो उपासी ॥ ३२० ॥ निराशेपाशीं न ये आधी । निराशेपाशीं सकळ विधी । सच्चिदानंदपदीं । मिरवे त्रिशुद्धी निराशू ॥ २१ ॥ ऐकोनि निराशेच्या नांवा । थोरला देवो घेतसे धांवा । त्यासी देखोनियां खेंवा । रूपनांवा विसरला ॥ २२ ॥ ते निराशेचा जिव्हाळा । पावोनि वेश्या पिंगला । जारपुरुषाशेच्या मूळा । स्वयें समूळा छेदिती झाली ॥ २३ ॥ जें आशापाशांचें छेदन । तेंचि समाधीचें निजस्थान । ते निजसमाधी पावोन । पिंगला जाण पहुडली ॥ २४ ॥ सर्व वर्णांमाजीं वोखटी । कर्म पाहतां निंद्य दृष्टीं । ते वेश्या पावन झाली सृष्टीं । माझे वाक्पुटीं कथा तिची ॥ २५ ॥ यालागीं वैराग्यापरतें । आन साधन नाहीं येथें । कृष्ण थापटी उद्धवातें । आल्हादचित्तें प्रबोधी ॥ २६ ॥ अवधूत सांगे यदूसी । प्रत्यक्ष वेदबाह्यता वेश्येसी । ते निराशा होतां मानसीं । निजसुखासी पावली ॥ २७ ॥ यालागीं कायावाचाचित्तें । उपासावें निराशेतें । यापरतें परमार्थातें । साधन येथें दिसेना ॥ २८ ॥ इतर जितुकीं साधनें । तितुकीं निराशेकारणें । ते निराशा साधिली जेणें । परमार्थ तेणें लुटिला ॥ २९ ॥ कृपा जाकळिलें

सर्वांना बाधक आहे. 'आशा' हाच मुख्य दोष आहे. १३ ज्याची आशा पूर्णपणें नाहींशी झाली, त्यालाच परमसुखाचा लाभ होतो. ब्रह्मादिक त्याचे चरण वंदितात. आठहि सिद्धि त्याच्या दासी होऊन रहातात. १४ निरिच्छ माणसांची भावना शुद्ध असते. त्यांच्यापाशीं भगवान् उभा रहातो. राजा किंवा देवहि निरिच्छ माणसाच्या शब्दाचें उल्लंघन करीत नाहीं. १५ जो निराश तोच सद्बुद्धिमान् व विवेकाचा ठेवा आहे. चारी मुक्ति पावलोपावलीं त्यांस वंदन करितात. १६ तें सर्व तीर्थांचेंहि तीर्थ आहे. मुमुक्षूचें धन आहे. निरिच्छतेपाशीं सर्वदा परमार्थ रहातो. १७ विरक्ति नैराश्याची दासी होऊन रहाते. हृषीकेश रात्रंदिवस निरिच्छ भक्तालाच पहाण्याची इच्छा करीत असतो. १८ निराशेला पाहून दुःख पळून जातें. तिच्यापाशीं नित्य सुख असतें. तिच्याजवळ संतोष मोकळेपणानें खेळत असतो. १९ तिच्या भेटीला वैकुंठाचा राजा धांवत येतो. सरळ स्वभावाचा महादेवहि तिची उपासना करितो. ३२० तिच्यापाशीं कधीं मानसिक दुःख येत नाहीं. सर्व विहित धर्म तिच्याजवळ असतात. निरिच्छ प्राणी निश्चयानें सच्चिदानंदपदाला प्राप्त होतो. २१ निराशेचें नांव ऐकतांच महादेव धांवत येतो आणि त्याला मिठी मारून नांव-रूपालाच विसरून जातो. २२ निराशेचें जीवन मिळतांच पिंगला वेश्येनें जाराच्या आशेचें मूळ स्वतःच समूळ छेदून टाकिलें. २३ आशारूपी पाश तोडणें हेंच समाधीचें निजस्थान आहे. त्याला प्राप्त होऊन पिंगलेनें शयन केलें. २४ सर्व वर्णांमध्यें हीन व जिचें कर्महि नीच अशी वेश्याहि या लोकीं पावन झाली, त्यामुळें तिची कथा माझ्या तोंडीं आली. २५ यास्तव वैराग्यासारखें दुसरें कोणतेंहि साधन नाहीं, असें श्रीकृष्णानें उद्धवाची पाठ थोपटून प्रसन्न मनानें सांगितलें. २६ अवधूत यदूला म्हणाला कीं, वेश्येला वेदाचा अधिकार नसतांहि तिच्या मनांत निराशा उत्पन्न होतांच तिला आत्मसुखाची प्राप्ति झाली. २७ यास्तव काया-वाचा-मनानें निराशेची उपासना करावी. याखेरीज परमार्थाचें दुसरें कोणतेंहि साधन या जगांत नाहीं. २८ इतर जेवढीं साधनें आहेत तीं सर्व निराशेसाठींच आहेत. एकदां निराशा मनांत ठसली कीं परमार्थ हातीं

अवधूतासी। यदूसी धरोनियां पोटासी। निराशता हे जे ऐसी। अवश्यतेसीं साधावी ॥३३०॥ एका जनार्दना शरण। त्याची कृपा परिपूर्ण। तोचि आशापाश छेदून। समाधान पाववी॥ ३३१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे यद्ववधूतसंवादे एकाकारटीकायां अष्टमोऽध्यायः॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

अध्याय नववा.

श्रीगणेशाय नमः। ॐ नमो सद्गुरु अमरपती। अनुभवू तोचि ऐरावती। स्वानंद मदें भद्रजाती। उन्मत्तस्थिती डुल्लत॥ १ ॥ उपदेशाचें वज्र तीख। छेदी संकल्पविकल्पपांख। जडजीव ते पर्वत देख। निजस्थानीं सम्यक स्थापिसी ॥ २ ॥ विवेकाचे पारिजात। वैराग्यसुमनीं घमघमित। मुमुक्षुभ्रमर रिघोनि तेथ। आमोद सेविती चित्सुख ॥ ३ ॥ उपशम तोचि बृहस्पती। विश्वासें तुझा निकटवर्ती। त्यासी मानिसी अतिप्रीतीं। तो सभेप्रती सदस्य ॥ ४ ॥ कृपाकामधेनूंचीं खिल्लारें। श्रद्धावत्सांचेनि हुंकारें। बोळल्या बोरसाचेनि भरें। तें दुभतें पुरे भागवतां ॥ ५ ॥ सतेज चिंतामणीचे खडे। सभोंवतीं लोळती चहूंकडे। भक्त न पाहती तयांकडे। चरणसुरवाडें सुखावले ॥ ६ ॥ स्वर्गांगना अष्टमासिद्धी। तुजपुढें

आलाच. २९ अवधूताच्या मनांत परमकृपा उत्पन्न झाली. तो यदूला पोटाशीं धरून म्हणाला-' अशी ही विरक्ति तूं अवश्य संपादन कर. ' ३३० एकनाथ जनार्दनस्वामींना शरण आहे. त्याची पूर्ण कृपाच सर्व आशापाश सोडून समाधान देते. ३३१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह यदु-अवधूत-संवाद
या नांवाचा आठवा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूप सद्गुरो! तुला नमस्कार असो. तूं देवांचा राजा इंद्र आहेस. अनुभव हाच तुझा ऐरावत आहे. इंद्राच्या ऐरावताचा जसा अखंड मदस्राव चालू असतो व तो निर्भयपणें जसा डुलत असतो, तसा तुझ्या अनुभवांतून ब्रह्मानंदाचा अखंड प्रवाह वहात असून अनुभवी जीव त्यांत तल्लीन होऊन डुलत असतो. १ इंद्राच्या वज्रानें पर्वतांचे पंख तोडून त्यांस जसें अचल केलें, तसें तुझें उपदेशरूप वज्र जीवांचे संकल्प-विकल्प तोडून त्यांस स्थिर करितें. २ विवेक हा पारिजातक वृक्ष असून वैराग्य हें त्याचें सुवासिक पुष्प आहे. मुमुक्षुरूपी भ्रमर त्यांवर बसून चित्सुखाचा मकरंद सेवन करितात. ३ इंद्रियनिग्रह हा बृहस्पति तुझ्या विश्वासानें तुझ्या संनिध रहातो. तूं त्याचा प्रेमानें आदर करितोस. तुझ्या सभेंतील तो मुख्य सभासद आहे. ४ इंद्राची कामधेनु जशी इष्टवस्तु देते, तशी तुझी कृपारूपी धेनु निर्विकल्पवस्तूसह सर्व इच्छा पूर्ण करिते. अशा या कृपाकामधेनूंचीं खिल्लारें तुझ्यापाशीं आहेत. श्रद्धारूपी वत्सांचा हंबरडा ऐकतांच त्यांना पान्हा फुटून तुझ्या भक्तांना कृपामृतरूपी दूध भरपूर मिळतें. ५ तुझ्या सभोंवार चिंतामणीचीं तेजस्वी रत्नें पसरलेलीं आहेत, पण तुझे भक्त त्यांकडे कधीं पहातहि नाहींत. तुझ्या चरण-सेवेनेंच ते सुखी होतात. ६ स्वर्गांत जशा अप्सरा नाचतात, तशा अष्टसिद्धि तुझ्यापुढें नानाप्रकारें नाचत असतात,